मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले


● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७२ ■ रविवार, ०१ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514









पाटोदा नगर पंचायत बांधकाम सभापती पदी उमर जुबेर मकराणी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना. पाटोदा नगर पंचायतचे माजी सभापती तथा विद्यमान नगरसेवक श्रीहरी(बापु) गिते पाटील

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा...)

# दिव्यांग शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन रोखणे बेकायदेशीर- श्री. तुकाराम मुंढे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** शिक्षक भारती संघटनेचे संस्थापक आ. कपिल पाटील, कार्याध्यक्ष श्री. सुभाष सावित्री किसन मोरे यांच्यासह शिक्षक भारती विशेष शाळा युनिटच्या पदाधिकाऱ्यांसोबत मित्तल टॉवर येथे झालेल्या बैठकीत श्री. तुकाराम मुंढे यांनी वरील आश्वासन दिले.

यावेळी खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना व आदेश निर्गमित केले जातील, असे ही त्यांनी आश्वस्त केले.

**नियमित वेतन**

नियमित वेतनासाठीचा निधी हा बांधील खर्च असून दरमहा तरतूद व वेतनविषयीच्या प्रत्येक कार्यालयातील कामकाजाची कार्यपद्धती व विहित कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महिन्याच्या 10 तारखेपर्यंत वेतन मिळणार.

**DCPS मधून NPS खाते सुरु करण्याबाबत**

दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय ईडीडी 2022/प्र. क्र. 112 दि. 4 डिसें 2024 च्या आदेशान्वये व दिव्यांग कल्याण आयुक्त यांचे दि. 13/11/2025 च्या परिपत्रकान्वये ज्या जिल्ह्यांनी अद्याप DCPS To NPS कार्यवाही केली नाही, त्या जिल्हा कार्यालयास तातडीने कार्यवाहीचे आदेश निर्गमित करण्याची सूचना त्यांनी कार्यालयातील अधिकाऱ्यांना दिली.

**अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत**

मुंबई शहर/उपनगरातील अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्याविषयी कोणतेही आदेश नसतांना ज्या जिल्हा कार्यालयानी तशी कार्यवाही केली आहे, त्यांची चौकशी करण्यात येईल व योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तसेच तीन महिन्यांचे थकीत वेतन त्वरित जमा करण्याचे आदेश सबंधित कार्यालयास देण्यात येतील.



**पटनिर्धारण निकष बदलण्याबाबत**

ज्या शाळा/कार्यशाळा/बालगृहे सुरळीत व पारदर्शी सुरु आहेत, त्यांची माहिती पोर्टलवर प्राप्त होत असून बोगस संस्था/शाळाची मान्यता काढून घेण्यासंबंधी कार्यवाही होत आहे. पटनिर्धारणाचे निकष तथा मार्गदर्शक तत्वे जिल्हा कार्यालयांनी तंतोतंत पाळणे आवश्यक असून, शाळा संहितेच्या संदर्भाने न्याय कार्यवाहीबाबत सूचित केले जाईल, असे ही त्यांनी सांगितले. ज्या शाळांमध्ये पटनिर्धारण चुकीचे झालेले आहे त्यांची तपासणी करण्यात येणार आहे. तातडीने दुरुस्ती करून शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**आश्वासित प्रगती योजना** - राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त प्राथ.,उच्च प्राथ., व माध्य. शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे संदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे दि. 31 जुलै 2025 च्या आदेशान्वये दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांना लाभ मिळावेत, अशी मागणी श्री. सुभाष मोरे यांनी केली असता, मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी दि. 17/04/25 व 23/09/25 रोजी ऑनलाइन बैठकीत प्रादे.उपायुक्त व सर्व जिदीसअ यांना सूचना दिल्या असून त्याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे त्यांनी आश्वस्त केले.

**सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत**

मुंबई शहर व उपनगरातील सात शाळांचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे, याकडे श्री.सुभाष मोरे यांनी लक्ष वेधले असता. नवीन सूची प्रमाणे ज्या शाळांचे प्रस्ताव संबंधित कार्यालयास प्राप्त झाले आहेत तातडीने पारित करण्याविषयीं आदेश दिले जातील. अशी माहिती ही त्यांनी यावेळी दिली.

या बैठकीस शिक्षक भारती विशेष शाळा युनिटचे राज्याध्यक्ष श्री. विलास पंडित, जिल्हाध्यक्ष श्री. संजय गोरड, जिल्हा सचिव डॉ. अतुलराजे जाधव, मुख्याध्यापक प्रतिनिधी श्री. मधुकर मोरे व श्रीम. सोनाली बाणे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## धुलीवंदनाच्या दिवशी जिल्ह्यात दारूची दुकाने बंद

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : नागपूर जिल्ह्यात ३ मार्च २०२६ रोजी धुलीवंदन उत्सव मोठया प्रमाणात साजरा होत असल्याने या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने किरकोळ देशी आणि विदेशी मद्य विकीची दुकाने (अनुज्ञप्त्या) बंद ठेवण्यात येणार आहे. नागपूर जिल्हयात या सणाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने जिल्हयातील मदय विक्रीच्या अनुज्ञप्त्या बंद ठेवण्यात येणार आहे.३ मार्च २०२६ रोजी "धुलीवंदन उत्सव-२०२६" या सणादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हयातील सर्व मंजूर व कार्यान्वीत असलेल्या नमुना-ई, नमुना-ई-२, एफएलडब्लु-२. सीएल-२, सीएल-३, एफएल-१, एफएल-२, सीएलएफएलटिओडी-३, एफएल-३, एफएल-४(अे), एफएलबीआर-२, व टिडी-१ हया अनुज्ञप्त्या संपूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेशीत करण्यात आले आहे.

## डॉ. पिल्लई ग्लोबल ॲकडमीमध्ये जागर मराठीचा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी ) :** पनवेल येथील डॉ. पिल्लई ग्लोबल ॲकडमी येथे जागर मराठीचा साजरा करत मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. मराठीची समृद्ध परंपरा, साहित्य, संतवाङ्मयाची शिकवण आणि भाषेचे वैभव विद्यार्थ्यांनी सुंदरपणे मांडले.या विशेष कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष पत्रकार प्रशांत शेडगे यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच विद्यालयाच्या व्यवस्थापक मेबल चॅन पिल्लई, मुख्याध्यापक प्रकाश नायर यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये २७ फेब्रुवारी रोजी



प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी मराठी भाषेचे महत्त्व सांगण्यासाठी सुविचार लेखन, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा, आणि निबंध स्पर्धा यांसारखे विविध सांस्कृतिक उपक्रम राबवले जातात, ज्यातून विद्यार्थ्यांना मराठी संस्कृती व भाषेची गोडी लावली जाते. मराठी भाषा गौरव दिन राज्यभर उत्साहात साजरा केला जातो. प्रत्येक मराठी माणसाला आपल्या मराठी संस्कृतीचा आणि साहित्याचा अभिमान वाटावा असा हा दिवस... मराठी भाषा फक्त महाराष्ट्रापुरतीच नाही तर सर्व सीमा ओलांडून सातासमुद्रापारही गेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला आहे. तसेच मराठी जगातील दहाव्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे.डॉ. पिल्लई ग्लोबल ॲकडमी मद्धे सर्व जाती धर्म आणि विविध भाषेचे विदयार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु या कार्यक्रमात भारताच्या अखंडपणाचे दर्शन घडवत विद्यार्थ्यांनी सादर केलेला अभंग भक्तिमय वातावरणात घेऊन गेला. त्यानंतर संतांच्या शिकवणीवर आधारित एक प्रभावी नाट्यप्रस्तुती सादर करण्यात आली. संतवाङ्मयातील मूल्ये, प्रेम, करुणा आणि समाजभान यांचा संदेश विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनयातून मांडला.संपूर्ण कार्यक्रम संतांच्या विचारांवर आधारित असल्याने प्रेक्षकांना मनोभावे बांधून ठेवण्यात तो यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि उपस्थित मान्यवरांचे प्रोत्साहन यांमुळे मराठी भाषा गौरव दिनाचा हा सुंदर उपक्रम अविस्मरणीय ठरला.

## महासंस्कृती : जागर स्त्री शक्तीचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

### भजनी मंडळांना भांडवली अनुदानाचे वाटप होणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महासंस्कृती जागर स्त्री शक्तीचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार दि. ०१ मार्च, २०२६ रोजी दु. १२:०० वाजता लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन, उलवे नोड येथे संपन्न होणार आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी त्यांच्या समवेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, सदस्या जिज्ञासा कोळी व इतर मान्यवर पाहुणे उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमात भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेत स्त्री ही शक्ती, त्याग आणि प्रेरणेचे प्रतीक मानली जाते. महिला लोककलांमध्ये विविध लोकगीत आणि नृत्याचे प्रकार आहेत, ज्यामध्ये पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि नृत्यशैलींचा समावेश असतो. महिलांच्या या कला, कौशल्ये आणि सामाजिक स्थानाला योग्य महत्त्व देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याकरीता नृत्य, गीत,नाटिका आणि विविध सादरीकरणांद्वारे स्त्रीशक्तीचा जागर मांडला जाईल. या सांस्कृतिक कार्यक्रमातून स्त्री सक्षमीकरणाचा संदेश सर्वांपर्यंत पोचविण्याचा उद्देश आहे. हा कार्यक्रम रसिकांसाठी पूर्णपणे विनामूल्य असून, नवी मुंबई परिसरातील कलाप्रेमींनी या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई करण्यात आले आहे. तसेच या कार्यक्रमामध्ये मा.मंत्री सांस्कृतिक कार्य ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते भजनी मंडळांना भांडवली अनुदान योजनेंतर्गत धनादेश वाटप करण्यात येणार आहे.

## पनवेल महापालिकेच्या आरोग्य सुविधेचे धिंडवडे; ५८ बेडचे रुग्णालय 'कागदावरच', तर लाखांचा निधी पडून!

### प्रशासकीय अक्षम्य दिरंगाई; दिपक कोळवणकर यांनी माहिती अधिकारात उघड केला पालिकेचा सुस्त कारभार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी):** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना सक्षम आरोग्य सेवा देण्याचे दावे करणाऱ्या प्रशासनाचा बुरखा आता फाटला आहे. गेल्या वर्षभरापासून ५८ खाटांचे 'संसर्गजन्य रोग रुग्णालय' (Infectious Disease Hospital) सुरू करण्याच्या केवळ घोषणाच हवेत विरल्या असून, तांत्रिक अडचणींचे रडगाणे गात हे रुग्णालय अद्याप कागदावरच असल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या रुग्णालयासाठी मंजूर झालेला हाऊसकीपिंग, दुरुस्ती आणि औषध खरेदीचा लाखो रुपयांचा निधी प्रशासकीय नाकर्तेपणामुळे खर्च न होता तसाच पडून आहे. दीपक कोळवणकर यांनी या गंभीर प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर पालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या पत्रातून हा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

**तांत्रिक अडचणींचा पालिकेला 'ताप'**

पनवेल महापालिकेने ५८ बेडचे रुग्णालय सिडकोच्या मालकीच्या इमारतीत सुरू करण्याचे नियोजित केले होते. मात्र, सिडकोशी संबंधित काही 'तांत्रिक अडचणी' असल्याचे कारण पुढे करत हे रुग्णालय कार्यान्वित करण्यात आलेले नाही. रुग्णालयच सुरू न झाल्याने २०२४-२५ या आर्थिक वर्षातील 'हाऊसकीपिंग' आणि 'हॉस्पिटल दुरुस्ती' या कामांसाठी मंजूर झालेली आर्थिक तरतूद खर्च होऊ शकलेली नाही. "जर तांत्रिक अडचणी होत्या, तर त्या सोडवण्यासाठी वर्षभर प्रशासन काय करत होते?" असा रोखठोक सवाल दीपक कोळवणकर यांनी उपस्थित केला आहे.

**निधी असूनही आरोग्य सेवा 'व्हेंटिलेटर'वर**

केवळ रुग्णालयच नाही, तर 'रासायनिक साहित्य' आणि 'आपत्कालीन वैद्यकीय निधी' देखील पूर्णपणे वापरण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. कोरोनासारख्या भीषण महामारीचा अनुभव गाठीशी असतानाही, भविष्यातील संभाव्य संकटांसाठी राखून ठेवलेला आपत्कालीन निधी खर्च न होणे, हे प्रशासनाचे मोठे अपयश मानले जात आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केवळ २६ केंद्रांवर बाह्यरुग्ण सेवा (OPD) सुरू असल्याचे सांगून पालिकेने आपली जबाबदारी झटकली आहे, मात्र मोठ्या उपचारांसाठी पनवेलकरांना आजही खासगी रुग्णालयांचा किंवा मुंबईचा रस्ता धरावा लागत आहे.

> ■ **"प्रशासनाचा बेजबाबदारपणा चव्हाट्यावर!"**
>
> **"महापालिकेकडे निधी उपलब्ध आहे, मात्र इच्छाशक्तीचा अभाव दिसतोय. तांत्रिक अडचणींचे निमित्त करून सामान्य नागरिकांना आरोग्य सुविधेपासून वंचित ठेवणे हा अन्याय आहे. प्रशासनाने निव्वळ पत्राद्वारे उत्तरे न देता प्रत्यक्ष आरोग्य सुविधा कधी कार्यान्वित होणार, याचे उत्तर द्यावे."**
>
> **— दिपक कोळवणकर (उपाध्यक्ष पनवेल महानगरपालिका क, का, सेना पनवेल)**

**स्वत:चे रुग्णालय नसलेली 'महा'पालिका**

पनवेल महानगरपालिकेची स्थापना होऊन अनेक वर्षे उलटली, तरी पालिकेकडे आजही स्वतःचे सुसज्ज रुग्णालय नाही. आजही शहरवासीयांना उपजिल्हा रुग्णालयाच्या भरवशावर राहावे लागते. "प्रशासनाकडून केवळ 'रुग्णालय प्रस्तावित आहे' असे छापील उत्तर मिळते, मात्र प्रत्यक्ष जमिनीवर काहीच दिसत नाही," अशी सडेतोड टीका दीपक कोळवणकर यांनी केली आहे.

## के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, आणि कोमसाप शाखा-पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन, स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी, ज्ञानपीठकार कुसुमाग्रज जयंती निमित्त "मराठी भाषा गौरव दिनी" मराठी भाषा गौरव दीन समारंभ व कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्ष वाचनालयाचे उपाध्यक्ष बी.पी. म्हात्रे, कोमसाप पनवेल अध्यक्ष कुडके, सचिव विजय द.गायकर, खजिनदार काशिनाथ जाधव जयश्री शेटे मॅडम, रोहिदास पोटे सर उपस्थित होते. पोटे सर, जाधव, गायकर, म्हात्रे, कुडके यांनी मराठी भाषेचे महत्त्व कसे वाढेल व त्यासाठी



आपण काय केलं पाहिजे याची उदाहरणे देऊन आपली मनोगत व्यक्त केली. कुडके सरांनी आपल्या मनोगतात कुसुमाग्रज, व तात्याराव लहानें कार्याचे विस्तृत वर्णन केले. रोहिदास पोटे सरांनी कुसुमाग्रज व स्वातंत्र्यवीरांच्या कवितासंग्रहाचे रसभरीत वर्णन केले. विजय गायकर यांनी आपण सर्व स्वातंत्र्य सैनिक, हुतात्म्यांनी परिश्रमपूर्वक, बलिदानाने हे राष्ट्र दिलेले आहे. आपण त्यांचे सदैव उतराई लागतो. धर्म, जात, पंथभेद न ठेवता त्यांच्या कार्याचा सन्मान आपण सदैव केला पाहिजे. काशिनाथ जाधवांनी कॉलेज जीवनात कुसुमाग्रजांच्या कवितांचा कसं गारुड होतं त्याबद्दल सांगितलं. म्हात्रे सरांनी हा कार्यक्रम आपण सर्वांनी मिळून खूप सुंदररित्या अगदी थोडक्या वेळात साकारलात त्याबद्दल धन्यवाद दिले. मी आता पुस्तकांचेही परीक्षण करतो हे सांगितले. राजकुमार ताकमोघे, प्रकाश पाटील, शिवाजी मोटे, नंदकुमार शिंदे, मीनल वसमतकर, करकरे मॅडम, विजय चव्हाण, नागनाथजी डोलारे, स्मिता गांधी, श्रद्धा तारे यांनी आपल्या कविता सुंदररित्या सादर केल्या.

## विद्यार्थ्यांनी शिवराय–आंबेडकरांचा आदर्श घेऊन प्रगती साधावी – प्रा. उमेश सिंगनजुडे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा :** जेवनाळा येथील जिल्हा परिषद डिजिटल पब्लिक स्कूलमध्ये आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचा दिमाखदार शुभारंभ उत्साहात पार पडला. उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. उमेश सिंगनजुडे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. शिवाजी महाराजांनी रयतेच्या न्यायासाठी स्वराज्य उभे केले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमता सहन करत ज्ञानाच्या बळावर जागतिक कीर्ती मिळवली. या दोन महामानवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रगतीचे शिखर गाठावे, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या दोन दिवसीय स्नेहसंमेलनाचे उद्घाटन २७ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद सदस्या सरिता कापसे यांच्या हस्ते करण्यात आले. पंचायत समिती लाखनीच्या सभापती अश्विनी मोहतुरे सहउद्घाटक म्हणून उपस्थित होत्या, तर कृषी उत्पन्न बाजार समिती लाखनीचे उपसभापती विनायकराव बुरडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती

व्यासपीठावर जेवनाळा गावच्या सरपंच वैशाली बुरडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा उपसरपंच प्रशांत गिर्हेपुंजे, पोलीस



पाटील विनाताई सेलोकर, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून आणि स्वागत नृत्याने झाली. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कला व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ**

शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या नृत्य, नाट्य आणि विविध सादरीकरणांनी कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अनिल कठाणे यांनी केले. प्रास्ताविक जे. एच. राठोड यांनी मांडले, तर उपस्थितांचे आभार योगिता फटे यांनी मानले. या यशस्वी स्नेहसंमेलनाबद्दल संपूर्ण परिसरात शाळेचे कौतुक होत आहे.

# एक लाख घरांच्या विक्रीचा टप्पा पूर्ण; कुटुंबाला मोफत घराची अनोखी भेट

## पनवेल तालुक्यातील ठोंबरेवाडी येथे गोदरेज सिटी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** विश्वास, कृतज्ञता आणि प्रगतीच्या एका सुवर्णक्षराचे साक्षीदार होत, गोदरेज प्रॉपर्टीजने एक लाख घरांच्या विक्रीचा ऐतिहासिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या यशाचे अनोखे सेलिब्रेशन म्हणून कंपनीने नवी मुंबईतील नेरुळ येथील रहिवासी असलेल्या नैना कुटुंबाला एक घर विनामूल्य भेट दिले आहे. ग्राहकांनी गेल्या अनेक वर्षांपासून गोदरेज समूहावर दाखवलेला अढळ विश्वास आणि त्यांच्यासोबत असलेल्या घट्ट नात्याचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम राबवला आहे. पनवेल तालुक्यातील ठोंबरेवाडी येथे गोदरेज सिटीमध्ये साकारलेले हे घर गोदरेज प्रॉपर्टीजच्या मूळ विचारधारेचे प्रतीक आहे. असून




त्या ठिकाणी हा सोहळा संपन्न झाला.

प्रत्येक घर हे प्रगती, आकांक्षापूर्ती आणि आपलेपणाची अनोखी कहाणी असते अशी कंपनीची धारणा आहे. या खास प्रसंगाचे औचित्य साधून कंपनीने लाखों मे एक ही विशेष मोहिम सुरु केली आहे. ही मोहिम गोदरेजवर विश्वास ठेवून घराची निवड करणा-या १ लाख कुटुंबांना समर्पित आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून कंपनीने एका ग्राहकाला हक्काचे घर भेट दिले आहे. अत्यंत पारदर्शक आणि चोख प्रक्रियेतून या लाभार्थ्याची निवड करण्यात आल्याचे कंपनीच्यावतीने सांगण्यात आले. ही कोणतीही स्पर्धा किंवा लॉटरी नसून, कंपनीच्या या सशस्वी प्रवासात सोबत असलेल्या ग्राहकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उचलले पाऊल आहे.

गोदरेज प्रॉपर्टीजचे कार्यकारी अध्यक्ष पिरोजशा गोदरेज म्हणाले,' हा क्षण म्हणजे एक लाख कुटुंबांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास, श्रध्दा आणि त्यांच्या स्वप्नपूर्तीचा मोठा सोहळा आहे. आम्ही सुपूर्द केलेली प्रत्येक घराची किल्ली ही आशेची एक नवी गोष्ट सांगते. आम्ही उभारलेली प्रत्येक वसाहत ही भारताच्या बदलत्या आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. एक लाख ग्राहकांचा हा टप्पा गाठल्यामुळे आम्हांस अभिमान आणि कृतज्ञता अनुभवता येत आहे. याचसोबत आता अगोदरपेक्षाही जास्त आत्मीयतेने आणि पूर्ण निष्ठेने काम करण्याची आमची जबाबदारी अधिक वाढली आहे, याची जाणीव होत आहे.''

गोदरेज प्रॉपर्टीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव पांडे म्हणाले, 'लाखों में एक हा उपक्रम आमच्यावर विश्वास ठेवणा-या प्रत्येक घरमालकाचा सन्मान करण्याचा आमचा एक प्रयत्न आहे. घर खरेदीच्या प्रत्येक निर्णयामागे प्रबळ इच्छाशक्ती, भावना आणि अपार कष्ट दडलेले असतात. गोदरेज प्रॉपर्टीला मानाचे स्थान मिळवण्यात योगदान देणा-या सर्व ग्राहकांचे मनापासून आभार व्यक्त करण्यासाठी आम्ही हा उपक्रम राबवत आहोत. भविष्याचा वेध घेताना समृद्ध जीवनशैली, नाती बहरणा-या वास्तूंची निर्मिती करणे जेणेकरुन लोकांच्या दैनंदि आयुष्यात आनंद निर्माण होईल, हेच आमचे ध्येय आहे.''

## पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधांसाठी आमदार राजू तोडसाम यांची विधानसभेत आक्रमक मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर:** "रस्ते अपघातात जखमी झालेला माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असतो, त्याला तातडीने उपचारांची गरज असते, पण पांढरकवडा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे त्याला यवतमाळला नेईपर्यंत त्याचा श्वास थांबतो... ही परिस्थिती आता बदलायलाच हवी!" अशा शब्दांत आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राजू तोडसाम यांनी मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारला साकडे घातले. राष्ट्रीय महामार्ग ४४ वर




वसलेल्या पांढरकवडा शहरात अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, केवळ वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे निष्पाप जीव जात असल्याबद्दल त्यांनी सभागृहात तीव्र चिंता व्यक्त केली.

आमदार तोडसाम यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडताना अत्यंत पोटतिडकीने सांगितले की, पांढरकवडा परिसर हा प्रामुख्याने आदिवासी बहुल असून येथील जनता अत्यंत गरीब आहे. खाजगी रुग्णालयातील महागडे उपचार या कष्टकरी बांधवांना परवडणारे नसल्यामुळे त्यांना सरकारी रुग्णालयाचाच एकमेव आधार असतो. अशा परिस्थितीत पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटरला केवळ कागदावर न ठेवता, तिथे तातडीने तज्ज्ञ डॉक्टर, आवश्यक मनुष्यबळ आणि अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. यासोबतच रुग्णालयाची क्षमता वाढवून ती १०० खाटांची करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी विधानसभा अध्यक्षांमार्फत थेट आरोग्य मंत्र्यांकडे लावून धरली.

केवळ पांढरकवडाच नव्हे, तर मतदारसंघातील आरोग्य सेवेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आमदार राजू तोडसाम यांनी आर्णी आणि घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयांना उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणीही लावून धरली. केळापूर, घाटंजी आणि आर्णी परिसरातील नागरिकांना त्यांच्याच भागात दर्जेदार उपचार मिळावेत आणि अपघातातील मृत्यूंचे प्रमाण शून्यावर यावे, यासाठी आरोग्य मंत्र्यांनी आता सकारात्मक आणि ठोस निर्णय घ्यावा, अशी भावना त्यांनी सभागृहात व्यक्त केली. आमदार तोडसाम यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे मतदारसंघातील जनतेच्या आशा आता पल्लवित झाल्या असून, सरकार यावर काय पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विकासनिधी कागदावरच? वॉर्ड क्र. १ मधील नागरिक अजूनही कच्च्या रस्त्यावर”

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले / लाखनी भंडारा :** सावरी/मुरमाडी येथील प्रभाग क्र. १ मधील नागरिकांना मागील तब्बल १५ वर्षांपासून पक्का रस्ता मिळालेला नाही. आजही नागरिकांना धुळीने भरलेल्या, खड्डेमय आणि कच्च्या रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. पावसाळ्यात हा रस्ता चिखलमय होऊन पूर्णपणे बंद पडतो, तर उन्हाळ्यात धुळीचे ढग उडून आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी आणि निवेदने दिली, परंतु



प्रशासनाने केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरवर्षी लाखो रुपयांचा विकासनिधी ग्रामपंचायतीला मिळत असताना वॉर्डातील मूलभूत गरज असलेला पक्का रस्ता का होत नाही, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.या रस्त्यामुळे शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, “मतदानाच्या वेळी आश्वासनांची बरसात होते, मात्र निवडणूक संपताच लोकप्रतिनिधी आणि प्रशासन वॉर्डाकडे पाठ फिरवतात.” प्रभाग क्र. १ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणार की प्रशासनाची उदासीनता अशीच सुरू राहणार, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

## साहित्य संघ मंदिर गिरगांव येथे शिवसेना आणि स्थानीय लोकाधिकार महासंघाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई समीर खाडिलकर / शांताराम गुडेकर :** ज्ञानपीठ विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी साजरा करण्यात येणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने गिरगाव येथील साहित्य संघ मंदिरात शिवसेना आणि स्थानीय लोकाधिकार महासंघाच्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात सुप्रसिद्ध श्री.निवास संगीतकार श्री.निवास खळे यांच्या गीतांवर आधारित संगीत रजनी हा कार्यक्रम




सादर करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर उद्योग व मराठी भाषा मंत्री श्री उदय सामंत,ज्येष्ठ नेते श्री. गजानन कीर्तीकर, माजी खासदार श्री. राहुल शेवाळे ,शिवसेना नेत्या सौ. मीनाताई कांबळी, मा.आ. सचिव/प्रवक्ते श्री. किरण पावसकर, प्रवक्त्या सौ.शीतल म्हात्रे, मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. संजय घाडी, बेस्ट समितीच्या अध्यक्षा सौ.तृष्णा विश्वासराव, सुधार समिती अध्यक्षा सौ.संध्या दोषी, 99 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पानिपतकार श्री.विश्वास पाटील यांसह नगरसेवक, पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

## देवगाव शोकसागरात! विहिरीत पडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू; कष्टाळू सचिन बोचरे काळाच्या पडद्याआड

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** देवगाव येथील सचिन विठ्ठल बोचरे (वय २५) यांचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सचिन बोचरे हे त्यांच्या



राहत्या घराजवळील विहिरीवर जनावरांसाठी पाणी काढत असताना अचानक त्यांचा पाय घसरला आणि ते थेट विहिरीत कोसळले. विहिरीतील पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी धाव घेतली; मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.सचिन बोचरे हे अत्यंत मनमिळावू, शांत व कष्टाळू स्वभावाचे म्हणून ओळखले जात होते.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी मेहनतीच्या बळावर संसार उभा करण्याचा प्रयत्न केला होता. गावातील प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणारा तरुण अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सदर घटनेची माहिती पोलीस पाटील सुनिल बोचरे यांनी पोलिसांना दिली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदिप शिंदे व औदुंबर मुरडणर करीत आहेत.

## ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय बसवंतपूर-वरवंटीची एन एम एम एस परीक्षेत उत्तुंग भरारी

**दैनिक युवक आधार**


**लातूर प्रतिनिधी :** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलेही यशाची शिखरे पादाक्रांत करू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत, सिंधी शिक्षण संस्था संचलित ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय, बसवंतपूर-वरवंटी येथील तब्बल नऊ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. या घवघवीत यशाने शाळा, पालक आणि संपूर्ण गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.या परीक्षेत शाळेतील श्रावस्ती सतीश कांबळे, रोहन रामभाऊ वाघमारे, अभिजीत नागनाथ साळुंखे, देवयानी सोमनाथ वंजारी, प्रीती प्रभाकर सोमवंशी, पियुष सचिन दीक्षित, चंद्रकला तानाजी अडगळे, समीक्षा नरेंद्र सूर्यवंशी आणि श्रेया सचिन साळुंके या नऊ विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे प्रमुख श्री. अविनाश जाधव यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना गुणपत्रक, पुष्पहार आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना जाधव यांनी समर्थ रामदासांच्या 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' या उक्तीचा दाखला देत, विद्यार्थ्यांच्या कष्टाचे चीज झाल्याचे समाधान व्यक्त केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री. स्वामी एस. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे सर, चाटे सर, चव्हाण सर, श्रीमती साबळे मॅडम, साळुंके सर आणि शेख सर यांनी या विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली होती. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बसवंतपूर-वरवंटी येथील ग्रामस्थ, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्वत्र या 'ज्ञानरत्नां'चे कौतुक होत आहे.

## ग्रामीण रुग्णालय मुदखेड येथे रुग्णांना अपुरे व निकृष्ट अन्न? नागरिकांत संताप

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी:-** मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालय मुदखेड येथे दाखल असलेल्या रुग्णांना दिले जाणारे अन्न अतिशय कमी प्रमाणात व निकृष्ट दर्जाचे दिले जात असल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे. संबंधित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी याबाबत नाराजी व्यक्त करत तात्काळ दखल घेण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,



रुग्णांना दिले जाणारे अन्नाचे प्रमाण इतके कमी आहे की एका वेळेची भूक देखील भागत नाही. विशेषतः दीर्घकालीन उपचार घेणाऱ्या रुग्णांना पौष्टिक व पुरेसे अन्न मिळणे अत्यावश्यक असताना, सध्याची परिस्थिती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. रुग्णांसोबत राहणाऱ्या नातेवाईकांना अन्नाची कोणतीही सोय नसल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाकडून रुग्णांच्या आहारासाठी निश्चित निधी व मार्गदर्शक तत्त्वे असताना प्रत्यक्षात अन्नपुरवठा कमी व निकृष्ट का दिला जात आहे? याबाबत जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित कंत्राटदार, आहार पुरवठादार तसेच रुग्णालय प्रशासन यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी करून रुग्णांना योग्य, पौष्टिक व पुरेशा प्रमाणात अन्न देण्याची व्यवस्था तातडीने करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.दरम्यान, आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती सुधारणा करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# लोकसेवेचा लोकजागर ग्रंथाच्या निमित्ताने...

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** अगोदर १२ वर्षे सक्रीय पत्रकारीता केल्यानंतर निलेश मदाने सन-२००४ मध्ये विधानमंडळ जनसंपर्क अधिकारीपदी रुजू झाले. विधानमंडळाचा अमृतमहोत्सव सन २०११-२०१२, नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी संसदीय अभ्यासवर्ग, संसदीय कार्यप्रणालीतील बलस्थानांविषयी लेखन, व्याख्याने, माननीय पीठासीन अधिकारी यांच्यासाठी टिपण, स्वीय सहायकांसाठी लोकसंपर्कासाठीची पुस्तिका आणि विधानमंडळातील मध्यवर्ती सभागृहात होणारे सर्व महत्वाचे कार्यक्रम यात त्यांनी जबाबदारी उत्तमप्रकारे पार पाडलेली आहे. महत्वपूर्ण संदर्भ, कार्यवृत्तातील चर्चा, काही राजकीय घटना या विषयावर त्यांचे सातत्याने लेखन सुरु असते. या सर्व गोष्टींचे चांगल्याप्रकारे दस्तावेजीकरण व्हावे असा त्यांचा सातत्याने प्रयत्न सुरु असतो. त्यातूनच लोकसेवेचा लोकजागर या ग्रंथाची संकल्पना साकार झाली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधानमंडळात आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री आणि सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते या संदर्भसमृध्द ग्रंथाचे प्रकाशन झाले. या ग्रंथाच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीनिमित्त भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनासमिती समोर केलेले महत्वपूर्ण भाषण, विधानमंडळ नागपूर अधिवेशनातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्तचा अभिवादन प्रस्ताव, मराठवाडा मुक्ती संग्रामाची ७५ वर्षे, पीठासीन अधिकारी यांचे मनोगत-मंथन तसेच सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन -२०२६ सुरु असल्याने मुख्यमंत्री यांचे अर्थसंकल्प सोप्या भाषेत उलगडून सांगणारे अभ्यासपूर्ण पुस्तक, तत्कालीन माननीय उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे अतिरिक्त अर्थसंकल्पावरील महत्वपूर्ण भाषण असे सारे महत्वाचे संदर्भ विधिमंडळाचे सन्माननीय सदस्य, स्वीय सहायक, पत्रकार, राज्यशास्त्राचे अभ्यासक यांना एकाच दृष्टीक्षेपात वाचायला मिळत आहेत. वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक (अ.का.) निलेश मदाने यांनी जनसंपर्क अधिकारी, विधान भवन तसेच सभापती यांचे जनसंपर्क अधिकारी या जबाबदाऱ्या सांभाळत अतिशय मेहनतीने हा लोकसेवेचा लोकजागर ग्रंथ सिध्द करुन वाचकांच्या हाती दिला आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या याअगोदरच्या प्रकाशनांप्रमाणेच हे प्रकाशन देखील सर्वांना उपयुक्त ठरेल असे आहे, यात शंका नाही.

# म्हसळा महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा : प्रतिनिधी / शिरीष समेळ :** मराठी भाषेचा अभिमान, तिची समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा गौरव करणारा मराठी राजभाषा दिन म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय येथे अत्यंत भावनिक आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महान कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आला होता.

प्राचार्य दिगंबर टेकळे यांच्या अध्यक्षतेखाली



सांस्कृतिक विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्या क्षणी सभागृहात मराठी भाषेप्रती आदर आणि कृतज्ञतेची भावना दाटून आली होती.

महाविद्यालयाचे अधीक्षक महेंद्र करडे, वरिष्ठ लेखनिक सुभाष साळवे आणि विद्यार्थीनी मेमन यांनी स्वरचित कविता सादर करून कार्यक्रमाला काव्यमय रंगत आणली. विशेषतः सुभाष साळवे यांच्या "तुला पाऊस का हवा?" या कवितेला उपस्थित श्रोत्यांनी भरभरून दाद देत टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक व्यक्त केले.

यानंतर इतिहास विभाग प्रमुख डॉ. संजय बेंद्रे यांनी "मराठी भाषेची उत्क्रांती आणि मराठी भाषेतील उच्चारातील गमतीजमती" यावर मार्गदर्शन केले. व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख कानिफ भोसले यांनी "समाजाचा स्तर ठरविण्यात भाषेचे महत्त्व" यावर विचार मांडले. डॉ. सिद्दीकी यांनी "मराठी भाषेने दिलेली सामाजिक व सांस्कृतिक देणगी" अधोरेखित केली, तर प्रा. यशवंत बंदरकरकर यांनी "विविध भाषांतील पुस्तकांचे मराठीत भाषांतर का आवश्यक आहे?" या विषयावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची जिवंत ओळख असल्याचे ठामपणे प्रतिपादन केले. तसेच बदलत्या काळात रोजगाराच्या विविध संधींमध्येही मराठी भाषेचे वाढते महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आर. एस. माशाले यांनी केले, तर आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मयूर बढे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नवी मुंबईत पहिल्यांदाच पुरुषांसाठी अँड्रॉलॉजी क्लिनिक; मेडिकव्हर हॉस्पिटलचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** मेडिकव्हर हॉस्पिटल्सने पुरुषांच्या प्रजनन आणि लैंगिक आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी नुकतेच अँड्रोलॉजी युनिट सुरू केले आहे. या विभागातंर्गत एकाच छताखाली वैद्यकीय सल्ला, आधुनिक उपचार आणि प्रगत मायक्रोसर्जिकल सुविधा पुरविली जाणार आहे. *डॉ. सनीश श्रृंगारपुरे(युरोलॉजिस्ट आणि अँड्रोलॉजिस्ट) आणि डॉ. विकास भिसे(युरोलॉजिस्ट) यांच्या नेतृत्वाखाली या विभागाचे कामकाज सुरु राहील.*

अँड्रोलॉजी ही युरोलॉजीची एक विशेष शाखा आहे जी पुरुषांचे प्रजनन आरोग्य, प्रजनन क्षमता, लैंगिक कार्य, संप्रेरक पातळी आणि लैंगिक विकृतींवर परिणाम करणाऱ्या परिस्थितींवर लक्ष केंद्रित करते. अनेक पुरुष लज्जेखातर किंवा जागरूकतेच्या अभावामुळे वेळीच उपचार घेण्यास विलंब करतात हे ओळखून, रुग्णालयाने पुरुष वंध्यत्व, इरेक्टाइल डिसफंक्शन, अकाली वीर्यपतन, व्हॅरिकोसेल, टेस्टोस्टेरॉनची कमतरता (हायपोगोनॅडिझम), पेरोनी रोग, अझूस्पर्मिया आणि टेस्टिक्युलर किंवा पेनाइल असामान्यता यासाठी व्यापक स्वरुपात निदान आणि उपचार पुरविण्यासाठी एक एंड्रोलॉजी युनिट सुरू केले आहे.

या युनिटमध्ये उपलब्ध प्रगत प्रक्रियांमध्ये मायक्रोसर्जिकल व्हॅरिकोसेलेक्टॉमी, इरेक्टाइल डिसफंक्शनसाठी पेनाइल प्रोस्थेसिस इम्प्लांटेशन, आयव्हीएफ किंवा आयसीएसआयसाठी टेस्टिक्युलर बायोप्सी आणि शुक्राणू काढण्याची विशेष तंत्राचा वापर , हायपोगोनॅडिझमसाठी हार्मोनल थेरपी, लिंगाची वक्रता सुधारण्यासाठी शस्त्रक्रिया, इरेक्टाइल डिसफंक्शनसाठी पीआरपी आणि शॉकवेव्ह थेरपी, पेनाइल लेन्थनिंग सर्जरी आणि लिंग बदल शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

डॉ. सनीश श्रृंगारपुरे सांगतात की,* बरेचसे पुरुष हे त्यांच्या लैंगिक आणि प्रजनन आरोग्याकडे दुर्लक्ष करतात आणि जागरूकतेच्या अभावामुळे बऱ्याचदा उपचारास विलंब होतो. वंध्यत्व, लिंगाच्या कार्यात अडथळा आणि हार्मोनल असंतुलन यासारख्या परिस्थितींना योग्य निदान आणि उपचारांची आवश्यकता असते. वैद्यकीय देखरेखीखाली लिंगाचा आकार वाढवण्याच्या प्रक्रियांचा शोध घेणाऱ्या तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि या क्लिनिकच्या माध्यमातून तज्ञांच्या देखरेखीखाली सुरक्षित उपचार पुरवले जाणार आहेत.

डॉ. विकास भिसे सांगतात की,* मूत्रपिंडातील खडे, प्रोस्टेटची वाढ आणि मूत्रमार्गातील संसर्ग यासारख्या सामान्य मूत्रविकारांचे प्रमाण वाढत आहे. लिंगाचे बिघडलेले कार्य आणि वंध्यत्वाच्या अनेक प्रकरणांमध्ये व्हॅरिकोसेल किंवा अझोस्पर्मिया सारखे विकार कारणीभूत ठरतात. वेळीच उपचार इरेक्टाईल डिसफंक्शन किंवा वंध्यत्व प्रभावीपणे व्यवस्थापित केले जाऊ शकते.पुरुषांच्या प्रजनन तसेच लैंगिक आरोग्याविषयीच्या समस्या सोडवून त्याबाबत लाज न बाळगता तज्ज्ञांशी खुलेपणाने चर्चा करण्यासाठी या विभागाची सुरुवात करण्यात आली आहे *अशी प्रतिक्रिया नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी व्यक्त केली.*

# सिल्लोडच्या शिवारात रब्बी काढणीचा 'धडाका'; ढगाळ हवामानाच्या अनुभवानंतर कडक उन्हात बळीराजाची लगबग!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** वातावरणातील बदलांचा अनुभव घेतलेल्या सिल्लोड तालुक्यातील बळीराजाने आता रब्बीचा हातातोंडाशी आलेला घास सुरक्षितपणे पदरात पाडून घेण्यासाठी शिवारात कंबर कसली आहे. मध्यंतरी दोन-तीन दिवस दाटून आलेल्या ढगाळ हवामानामुळे पिकांच्या नुकसानीची धास्ती निर्माण झाली होती. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पडलेल्या कडक उन्हामुळे शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकत हरभरा आणि गव्हाच्या काढणीला युद्धपातळीवर वेग दिला आहे.तालुक्यात यंदा रब्बी हंगामातील पिके समाधानकारक स्थितीत असली तरी, निसर्गाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्यांची चिंता वाढवली होती. ढगाळ वातावरणामुळे पिकांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती असतानाच, आता पुन्हा उन्हाचा कडाका वाढल्याने पिके पूर्णपणे परिपक्व झाली आहेत. पुन्हा हवामानात कोणताही अनपेक्षित बदल होण्याआधी काढणी उरकून घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

शिवारात सध्या पहाटेपासूनच लगबग पाहायला मिळत असून, मजूर टंचाईवर मात



करण्यासाठी अनेक ठिकाणी यंत्रांच्या साहाय्याने मळणी केली जात आहे. कापणी केलेला हरभरा शेतातच गंज लावून सुरक्षित ठेवला जात असून, तो लवकरात लवकर मळणी यंत्रातून काढून सुरक्षित ठिकाणी साठवण्यावर भर दिला जात आहे. कडक उन्हाच्या झळा सोसत असतानाही, मागील दिवसांतील ढगाळ वातावरणाचा अनुभव गाठीशी असल्याने शेतकरी आता कोणतीही जोखीम पत्करायला तयार नाही. एकंदरीतच, वातावरणातील चढ-उतार लक्षात घेता, सिल्लोड तालुक्यातील ग्रामीण भागात रब्बी हंगाम सुरक्षितपणे आटोपण्यासाठी बळीराजाची मोठी धडपड सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

# घाटंजीत लोकगीतांचा जागर; राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत चंद्रपूरचा 'स्पार्टन्झ' ग्रुप प्रथम

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** घाटंजी येथील शिवजयंती उत्सव समिती व राजे छत्रपती सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धा प्रचंड उत्साहात पार पडली. लोकगीतांवर आधारित असलेल्या या स्पर्धेने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

दिग्गजांची उपस्थिती

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे होते, तर उद्घाटन जिल्हा काँग्रेस सरचिटणीस जितेंद्र मोघे यांच्या हस्ते झाले. यावेळी अभिषेक ठाकरे, शैलेश इंगोले, राम खांडरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. ऑनलाईन ऑडिशनमधून निवडलेल्या १५ उत्कृष्ट



संघांनी या अंतिम स्पर्धेत आपली कला सादर केली.

कलाकारांनी जिंकली प्रेक्षकांची मने

स्पर्धकांनी शिवचरित्र, पोवाडा, गोंधळ, जोगवा आणि आदिवासी ढेमसा यांसारख्या लोककला सादर केल्या. यामध्ये काही सादरीकरणे विशेष लक्षवेधी ठरली:

चंद्रपूर ग्रुप: 'वंदे मातरम' या देशभक्तीपर गीताने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

लहान मुले: संत गजानन महाराज व मातोश्री स्कूलच्या चिमुकल्यांनी सादर केलेला 'शिव पाळणा' आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

नटराज ग्रुप (घाटंजी): अफझल खान वधाचा देखावा हुबेहूब उभा करून वाहवा मिळवली.

मोर्शी ग्रुप: आदिवासी ढेमसा नृत्याने प्रेक्षकांनाही ताल धरायला लावला.

स्पर्धेचा निकाल:

१. प्रथम क्रमांक: स्पार्टन्झ ग्रुप, चंद्रपूर

२. द्वितीय क्रमांक: द वाईब्स, पांढरकवडा

३. तृतीय क्रमांक: ए.बी.डी. ग्रुप, यवतमाळ

४. चतुर्थ क्रमांक: नटराज डान्स ग्रुप, घाटंजी

याशिवाय ६ प्रोत्साहनपर बक्षिसेही देण्यात आली. सौ. मिनल कसणारे, संतोष डोंगरे, मयूर मरस्कोल्हे व आकाश कवासे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कार्यक्रमाचे संचालन रूपेश कावलकर यांनी, तर आभार प्रदर्शन राजेश उदार यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दीपक महाकुलकर, पुष्कर राऊत, शरद सोयाम यांच्यासह संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

# द्रोणागिरीत सतर्क नागरिकांमुळे 'इन्स्टा रोमिओ' पोलिसांच्या ताब्यात; १२ वर्षाच्या मुलीचा ६ महिन्यापासून करत होता छळ!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** द्रोणागिरी सेक्टर ५१ मधील एका धक्कादायक घटनेत १२ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा सोशल मीडियाच्या माध्यमातून छळ करणाऱ्या हुसेन अन्सारी नामक व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. द्रोणागिरीतील जागरूक नागरिकांच्या सतर्कतेमुळे ही कारवाई करणे शक्य झाले. द्रोनागिरी सेक्टर५१ देवकृपा बिल्डिंग जवळील किराणा दुकानात रात्री १० च्या सुमारास घडलेली घटना संशयित व्यक्ती हुसेन अंसारी यांनी एका १२ वर्षिय मुलीला तिच्या इन्स्टाग्राम आयडी बद्दल विचारणा केली आणि तीही रस्त्यावरील वर्दळ कमी झाली हि संधी साधून त्याने या पिडीत मुलीजवळ विचारणा केली. ही बाब जागरूक नागरिक धनंजय शिंदे यांच्या निदर्शनास आली त्यांनी तातडीने मुलीकडे चौकशी केली असता ती प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत होती आणि ती व्यक्ती तिला इन्स्टा आयडी विचारत असल्याचे तिने सांगितले.

नागरिकांनी या संशयित व्यक्ती ला पकडले असता त्याच्या मोबाईल मध्ये महिलांच्या नावाने २ बनावट insta-gram आयडी सापडले. आणि गेल्या सहा महिन्यापासून तो या मुलीला मेसेज करून त्रास देत असल्याचे समोर आले आहे . संशयित व्यक्तीला सध्या पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.



असे प्रकार टाळण्यासाठी आपल्या पाल्यांच्या सोशल मीडिया वापराकडे लक्ष द्या. आपल्या पाल्याच्या इंस्टाग्राम फेसबुक यासारख्या प्लॅटफॉर्मवर त्यांची खाती प्रायव्हेट असल्याची खात्री करा, अनोळखी व्यक्तींच्या मेसेजला प्रतिसाद देऊ नका अनोळखी मुलांची मैत्री पूर्ण संवाद ठेवा जेणेकरून त्यांना कोणी त्रास देत असल्यास ते भीती न बाळगता तुम्हाला सांगू शकतील महिलांच्या नावाने चालवल्या जाणाऱ्या अनेक बनावट आयडी चा वापर गुन्हेगार करतात अशा प्रोफाइल्स करून येणाऱ्या रिक्वेस्ट स्वीकारताना सावध रहा .

द्रोणागिरी सेक्टर 51 या घटनेत धनंजय शिंदे यांनी दाखवलेली सतर्कता प्रत्येक नागरिकांनी राखण्याचे गरजेचे आहे. संशयास्पद प्रकार आढळले तर स्वतः कायदा हातात न घेता त्वरित पोलिसांना कळवा.द्रोणागिरी परिसरात गेल्या काही दिवसांपासून छेडछाडीच्या आणि अल्पवयीन मुलींना सोशल मीडियावरून त्रास देण्याच्या घटनांमध्ये वारंवार वाढ होत आहे सेक्टर ५१ मध्ये ही नुकतीच घडलेली घटना एक धोक्याची घंटा आहे हे वाढते प्रकार रोखण्यासाठी केवळ पोलीस प्रशासनच नाही तर प्रत्येक नागरिकांनी संघटित आणि सतर्क राहणे आज काळाची गरज आहे. नागरिकांनी एकत्र येऊन सुरक्षा गट तयार करावेत आजूबाजूला कोणी संशयास्पद व्यक्ती फिरत असल्यास किंवा कोणाचे वर्तन आक्षेपार्ह वाटल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता एकमेकांना सावध करा, एखादी घटना घडल्यास केवळ तक्रार करून थांबू नका तर त्या प्रकरणाचा कायदेशीर पाठपुरावा करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करा गुन्हेगाराला शिक्षा होईपर्यंत पाठपुरावा करणे आज गरजेचे आहे.

# पीएम श्री योजनेच्या मूल्यमापनासाठी केंद्रीय चमूची लाखनीतील गांधी विद्यालयाला भेट; शैक्षणिक कार्याबाबत समाधान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले / लाखनी भंडारा :** लाखनी - दि. २८ फेब्रुवारी २०२६ ला पीएम श्री योजनेअंतर्गत मूल्यमापनासाठी पीएम श्री जिल्हा परिषद गांधी विद्यालय, लाखनी येथे केंद्र शासनाच्या अधिकृत चमूची भेट पार पडली. शाळेतील शैक्षणिक उपक्रम, पायाभूत सुविधा व विद्यार्थ्यांचा सहभाग पाहून अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान केंद्रीय नोडल ऑफिसर तथा इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागाचे जॉईंट




सेक्रेटरी मा. सुदीप श्रीवास्तव यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. भंडारा मा. रवींद्र सोनटक्के, उपशिक्षणाधिकारी राहुल बावा व मोहन उशिरे, तसेच गटशिक्षणाधिकारी सुभाष बावनकुळे यांची मान्यवर उपस्थिती लाभली.विद्यालयाचे मुख्याध्यापक रवीकुमार मेश्राम यांनी मान्यवरांचे स्वागत करून शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा, विविध शालेय उपक्रमांचा व उपलब्ध सुविधांचा सविस्तर आढावा सादर केला. यानंतर मूल्यमापन चमूने विविध वर्गांना भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अडचणी, अनुभव व शैक्षणिक प्रगती जाणून घेत शिक्षकांशी अध्यापन पद्धती, नवोपक्रम व प्रकल्पाधारित शिक्षणाबाबत चर्चा करण्यात आली.चमूने शाळेतील स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, डिजिटल साधनसामग्री, प्रयोगशाळा व वाचनालयाचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. विद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता व योजनांची प्रभावी अंमलबजावणी समाधानकारक असल्याचे नमूद करत अधिकाऱ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.हा कार्यक्रम शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# नागपूर शहर तहसील कार्यालयातर्फे शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** तहसिल कार्यालय नागपूर (शहर) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक १ अंतर्गत शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ७ मार्च रोजी रोजी लोहार समाज भवन, शताब्दी चौक येथे शिबिर घेण्यात येणार आहे.सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत नागरिकांना व विद्यार्थ्यांना सेवा देण्याकरिता भव्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे,अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तत्काळ सेवा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे,नागरी सुविधा - 1. एक खिडकी व्यवस्था, ई-मोजणी II. ॲग्रीस्टंक III. पी एम किसान इ., सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटप करणे, तुकडेबंदी कायद्याबाबतची प्रकरणे निकाली काढणे यासह इतर विभागाशी निगडीत कामे करण्यात येणार आहे. नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठी भाषेचा अभिमान जागवणारी ग्रंथसंपदेची मेजवानी ; जिल्हा ग्रंथालयात भव्य ग्रंथ प्रदर्शनी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य ग्रंथ प्रदर्शनीने मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा अभिमान जागवला. विद्यार्थ्यांसह ग्रंथप्रेमी वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी महेंद्र ताजने यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी जिल्हा ग्रंथालय अधिकारी बा. सं. कातकडे उपस्थित होते. प्रारंभी मराठी साहित्यातील अजरामर व्यक्तिमत्त्व वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उद्घाटक महेंद्र ताजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी ही आपली मातृभाषा असून तिचा दैनंदिन व्यवहारात अभिमानाने वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. मराठी साहित्याची गौरवशाली



परंपरा आणि कुसुमाग्रज यांच्या साहित्यसंपदेचे महत्व त्यांनी प्रभावी शब्दांत स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात बा. सं. कातकडे यांनी वाचन संस्कृती ही समाजाच्या बौद्धिक प्रगतीची पायाभूत गरज असल्याचे सांगत, अशा ग्रंथ प्रदर्शनीसारखे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तांत्रिक सहाय्यक नरेश काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ लिपिक गंगाराम बेंद्रे, विनोद निंभोरकर व विलास कांबळे यांनी परिश्रम घेतले. या ग्रंथ प्रदर्शनीस विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रंथप्रेमी वाचकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठी भाषा गौरव दिन साजरा केला.

# नागरिकांच्या विश्वासाला महापौरांकडून दाद; प्रभाग 14 मधील समस्यांचा 'ऑन द स्पॉट' आढावा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १४ मधील प्रलंबित नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी आज, (२८ फेब्रुवारी) सकाळी या प्रभागाचा विशेष पाहणी दौरा केला. प्रभाग १४ मधील साईनगर, एचओसी कॉलनी आणि परिसरातील विविध गृहनिर्माण संस्थांमधील नागरिकांनी आपल्या भागातील सफाई, कचरा व्यवस्थापन, रस्ते दुरुस्ती, सांडपाणी वाहिनी (सीवरेज लाईन) आणि पाणी समस्यांबाबत मयुरेश नेतकर यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले होते. गेल्या पालिका निवडणुकीत या प्रभागातून भाजपचे उमेदवार पराभूत झाले असले, तरी आपल्या समस्या केवळ भारतीय जनता पक्ष आणि महापौरच सोडवू शकतात, असा ठाम विश्वास येथील नागरिकांनी



व्यक्त केला. नागरिकांच्या या भावनांची दखल घेत मयुरेश नेतकर यांनी महापौरांकडे या दौऱ्याची मागणी केली होती, त्यानुसार आज सकाळी ८ वाजता या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले.

या पाहणी दौऱ्यादरम्यान साईनगर, एचओसी कॉलनी, गृहनिर्माण संस्था आणि नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी स्थानिक नागरिकांनी महापौरांचे औक्षण करून उत्साहात स्वागत केले. "आमची कामे आपल्यामार्फतच होऊ शकतात," असा विश्वास व्यक्त करत नागरिकांनी मयुरेश नेतकर यांनाही अशाच प्रकारे जनहिताचे काम करत राहण्याच्या सूचना केल्या. या दौऱ्यात महापौरांसोबत पालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, सुधीर साळुंखे आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारी आणि सूचना ऐकून घेतल्यानंतर महापौरांनी या सर्व समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे कडक निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

प्रभागातील उर्वरित भागात देखील अशाच प्रकारचे नियोजन आगामी काळात केले जाणार असून, त्याद्वारे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याचा भाजपचा मानस आहे. नागरिकांनी आपल्या कोणत्याही समस्यांसाठी श्री मयुरेश नेतकर यांचे जनसंपर्क कार्यालय, शॉप क्र. २, श्री कृष्ण रुक्मिणी निवास, जुना ठाणा नाका, पनवेल येथे भेट द्यावी किंवा ९८२१५३१५४७ या क्रमांकावर संपर्क साधून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. याप्रसंगी मयुरेश नेतकर यांच्यासह सतीश पाटील, भाजपचे प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, माजी नगरसेविका सारीका भगत, तुषार कापरे, रोहित आटवणे, सचिन गमरे आणि केदार माने यांसह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल भविष्याकडे भक्कम पाऊल : बार्टी व MCED कडून एससी युवक-युवतींसाठी मोफत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण स्वावलंबनाची नवी संधी

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील युवक-युवतींना तांत्रिक कौशल्ये व उद्योजकतेच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल मार्केटिंगवर आधारित तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम दि.२७फेब्रुवारी ते २मार्च दरम्यान राबविण्यात येत आहे. हा उपक्रम सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.या प्रशिक्षणात डिजिटल मार्केटिंगची मूलतत्त्वे, सोशल मीडिया व्यवस्थापन, ब्रँडिंग, ऑनलाइन मार्केटिंग संकल्पना, एसईओ, गुगल सर्च तंत्रज्ञान, कंटेंट क्रिएशन, ई-मेल मार्केटिंग, लीड जनरेशन, ॲनालिटिक्स तसेच प्रॅक्टिकल प्रोजेक्ट्सचा समावेश आहे. यासोबतच उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रकल्प अहवाल तयार करणे, व्यवसाय नोंदणी प्रक्रिया, कर्ज व अनुदान योजनांची माहिती यांचाही समावेश करण्यात आला आहे.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे**

प्रशिक्षणासाठी अर्ज करताना खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे :

स्वतःचा जातीचा दाखला
आधार कार्ड
शाळा सोडल्याचा दाखला
गुणपत्रिका
पॅन कार्ड
दोन पासपोर्ट साईज फोटो




रहिवासी दाखला

प्रवेशासाठी अटी व शर्ती

लाभार्थी अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील असावा

महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल

किमान १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावावयोमर्यादा : १८ ते ४५ वर्षे

शैक्षणिक पात्रता : किमान दहावी उत्तीर्ण

स्वतःचा उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्याची प्रबळ इच्छा असावी,कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा,सीआयबीआयएल (CIBIL) स्कोर समाधानकारक असावा.प्रशिक्षणादरम्यान इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांचे कर्ज प्रकरण देखील मार्गदर्शनासह पुढे नेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

मार्गदर्शन व नेतृत्व

या उपक्रमामध्ये श्री. एच. आर. वाघमारे (राज्य समन्वयक बार्टी प्रशिक्षण प्रकल्प) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.मा. श्री. अनिल कारंडे, उपजिल्हाधिकारी तथा विभाग प्रमुख, कौशल विभाग, बार्टी पुणे यांचे प्रशासकीय नेतृत्व असून मा. श्री. सुनील वारे (IRAS), महासंचालक, बार्टी पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची अंमलबजावणी होत आहे.अधिक माहिती व नावनोंदणीसाठी संपर्क

माननीय श्री. दिनेश अदक, कार्यक्रम आयोजक, (MCED) मुंबई – 9158531235

श्री. प्रदीप सावंत, प्रकल्प अधिकारी,(MCED) मुंबई – 9168667184

श्री. डी. यू. थावरे, विभागीय अधिकारी, (MCED) मुंबई – 9168667157

श्रीमती मेघा पवार, प्रकल्प अधिकारी, बार्टी मुंबई – 9664474143

**कार्यालय पत्ता :**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED),
कोकण भवन, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई – 400614

डिजिटल क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता हा प्रशिक्षण कार्यक्रम युवक-युवतींसाठी जीवनाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. पात्र व इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून स्वावलंबनाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




**हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्ताने खारघर ओवे सेक्टर १९ येथील मैदानावर दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी 'हिंद-दी-चादर' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या भव्य कार्यक्रमाला भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपमहापौर प्रमिला पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, स्वप्निल ठाकूर, अपूर्व ठाकूर, यांच्यासह नगरसेवक नगरसेविका पदाधिकारी लाखो भाविक उपस्थित आहेत. यावेळी त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाला सकाळपासूनच हजेरी लावली असून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. सकाळपासून गुरुबाणी, कीर्तन, पाठ आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला.नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. गुरुद्वाराच्या परंपरेनुसार लंगर सेवेचे आयोजन करण्यात आले असून हजारो स्वयंसेवकांनी सेवा कार्यात सहभाग घेतला आहे. ( दैनिक युवक आधार )**

# वारली चित्रकलेत आदिवासी संस्कृतीचे स्थान जपले आहे : अंकुश दळवी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवसीय वारली चित्रकला कार्यशाळा संपन्न झाली.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित वारली चित्रकला प्रशिक्षक श्री अंकुश दळवी, प्रदीप जाधव, दादाजी थैल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अंकुश दळवी यांनी सांगितले की, वारली चित्रकला ही पालघर,




ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध आहे. कुडाच्या भिंतीवर. शेणाने सारवून गेरू व चुण्याचा वापर करून शेती, शिकार, मासेमारी,पक्षी,प्राणी, शेतमजूर, कामगार यांचे चित्र काढून जीवन संस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्न केला आहे असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आदिवासी भागातील लोकांचे जीवनमान हे वारली चित्रकला साकारून घराघरात आदिवासी संस्कृती पोहोचली आहे. समाज आणि संस्कृती ही आदिवासी बांधवांची ओळख आहे. वारली कलावंत जिव्या सोमा म्हसे यांनी वारली चित्रकला जर्मनी ,फ्रान्स, जपान ह्या आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी जगभरातील विविध देशांमध्ये प्रयत्न केला आहे. असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमात वारली चित्रकला प्रात्यक्षिक करून दाखवले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेश भोये यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. डॉ. विजय अहिरे यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे आय क्यू एस्सी समन्वयक डॉ. चंद्रकांत पाटील प्रा सुभाष कामडी, प्रा केशव गावित, प्रा.शंकर भगरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेत व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया इथं स्थानिक झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या सतनाम व्यसनमुक्ती केंद्रात आज भव्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील वाढते व्यसनाधीनतेचे प्रमाण कमी व्हावे आणि युवा पिढीला या विळख्यातून बाहेर काढावे, या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

परराज्यातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात इतर राज्यांतून बी.एल.मासोदकर,अजय जेम्स (बैतूल), संतोष वळवी आणि रोहिदास नाईक(नंदुरबार),आलेल्या अनुभवी मार्गदर्शकांनी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. व्यसनाधीनतेमुळे केवळ व्यक्तीचेच नाही, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि समाजाचे कशा प्रकारे नुकसान होते, याचे वास्तववादी चित्रण त्यांनी आपल्या भाषणातून मांडले.

लोकसहभागातून व्यसनमुक्तीचा संकल्प




कार्यक्रमात उपस्थित स्थानिक नागरिक आणि मान्यवरांशी संवाद साधत 'समाजातून व्यसनमुक्ती कशी दूर करता येईल?' यावर मते जाणून घेण्यात आली. व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी केवळ संस्थात्मक प्रयत्न पुरेसे नसून, प्रत्येकाने आपापल्या स्तरातून पुढाकार घेणे गरजेचे आहे, असा सूर या चर्चेतून उमटला.

**कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये:**

व्यसनमुक्तीचे महत्त्व: व्यसन सोडल्यानंतर मिळणारे आरोग्यदायी आयुष्य आणि मानसिक शांतता यावर भर.

अनुभव कथन: व्यसनमुक्त झालेल्या काही व्यक्तींनी आपले अनुभव मांडले.

मार्गदर्शन: परराज्यातील वक्त्यांनी विविध उपचारात्मक पद्धती आणि सामाजिक जनजागृतीच्या मॉडेल्सवर माहिती दिली.

या कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष सचिन बन्सोडे सर ,टि.वाय. चिर्वतकर सचिव, सुनिता सव्वालाखे सदस्य आणि सदस्यकार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतनाम व्यसनमुक्ती केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शीख समाजाचा इतिहास उलगडणारे 'विरासत-ए-सीख' प्रदर्शन ठरतंय भाविकांचे आकर्षण

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** खारघर ओवे मैदान येथे सुरू असलेल्या हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त शीख समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे 'विरासत-ए-सीख' हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हे प्रदर्शन भाविकांसाठी आकर्षण ठरत असून या कार्यक्रमाला उपस्थिती लावलेले भाविक



आवर्जून प्रदर्शनाला भेट देत आहेत. शीख धर्माच्या स्थापनेपासून ते गुरू गोविंद सिंग यांच्यापर्यंतच्या सर्व गुरूंचा इतिहास, त्यांनी दिलेले योगदान सचित्र स्वरूपात मांडण्यात आला आहे. विशेषतः हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबत शीख योद्ध्यांनी वापरलेली विविध शस्त्रास्त्रे या प्रदर्शन दालनात ठेवण्यात आली आहेत. शीख धर्माचे पहिले गुरु श्री गुरु नानक जी ते शेवटचे गुरु गोविंद सिंगजी यांचा इतिहास व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख धर्मासोबतच सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव समाजातील महापुरुषांचाही इतिहास या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आला आहे. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या 350 शहीदी समागमनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले भाविक आवर्जून 'विरासत-ए-सीख' या प्रदर्शनाला भेट देत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# राज्य सरकारला सीधा टक्कर देणारा बोर्ली भ्रष्टाचार विषय";बोर्ली (मुरुड)ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरण ;चौकशी झाली, कारवाई नाही

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : बोर्ली ग्रामपंचायत निधी प्रकरणात रायगडच्या पारदर्शकतेचा बुरखा फाडला"कोट्यवधींचा अपहार, अहवाल गुप्त: राज्य सरकारला सीधा टक्कर देणारा बोर्ली भ्रष्टाचार विषय" रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रुप ग्रामपंचायतीत 15व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विकासकामांमध्ये कोट्यवधींच्या अपहाराचा गंभीर संशय व्यक्त झालेला असताना, चौकशी केल्यानंतर चार महिन्यांनंतरही अधिकाऱ्यांची अजूनही मूक तालीम चालू असल्याचा आरोप जोर धरून व्यक्त होत आहे. माहिती अधिकाराने उघड झालेला हा भ्रष्टाचार आता फक्त गावखेड्यातील नाही, तर राज्य आणि जिल्हा पातळीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मिशनरीच्या शंकेत अडकला आहे.

"निधीचा डोलारा"

RTI ने उघडले अनियमिततेचे धागेदारमुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रुप ग्रामपंचायतीत 2023-24 व 2024-25 या आर्थिक वर्षांत आलेल्या 15व्या वित्त आयोग निधीच्या अनेक विकासकामांबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रतिक प्रमोद कणगी (ताराबंदर, बोर्ली–मांडला) यांनी RTI अर्जातून प्रश्न विचारले होते.

त्यात अनेक कामांसाठी GST बिल, वर्क ऑर्डर, काम पूर्णत्व प्रमाणपत्र आणि जिओ-टॅगिंग पुरावे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे निधी खर्चाच्या नावावर खोट्या कामांचा खेळ असल्याचा संशय नागरिकांना निर्माण झाला.

"तक्रार, चौकशी आणि ती अडलेली अंतिम उडी"

१६ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड येथे लेखी तक्रार दाखल करण्यात आली. यानंतर पाठपुरावा करण्यात आल्यानंतर ०१ जानेवारी २०२६ रोजी चौकशी अधिकारी नियुक्त करून प्रत्यक्ष स्थळपाहणीही करण्यात आली.



चौकशीदरम्यान काही कामे प्रत्यक्षात झालेली नाहीत, तर काही जुन्या कामांना नव्याने दाखवून निधी खर्च दर्शवल्याचा संशय अधिकाऱ्यांनी नोंदवला. तरीही चार महिन्यांनंतरही अंतिम चौकशी अहवाल सार्वजनिक झाला नाही आणि दोषी मानल्या जाणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय, आर्थिक किंवा फौजदारी स्तरावरील कारवाई दिसत नाही.

"बंद पाकीट जादू"ची चर्चा "

रायगड जिल्हा परिषदमधील अधिकाऱ्यांवर ठेपा नागरिकांमध्ये हळूहळू एक धाक वाढू लागला आहे की, बोर्लीमधील अपहार प्रकरण केवळ ग्रामस्तरावरचा भ्रष्टाचार नाही, तर त्यात रायगड जिल्हा परिषद–स्तरावर अधिकाऱ्यांची "बंद पाकीट जादू" देखील असू शकते. स्थानिकांमध्ये असा तीव्र आरोप आहे की, जिल्हा परिषद व पंचायत राज विभागातील काही वरिष्ठ अधिकारी या अहवालाला दाबून ठेवण्यासाठी अनेक बाबींची लगाम ठेवत आहेत. त्यामुळे चौकशी अधिकारी आणि प्रशासन दोन्हीकडे मूक तालीम देखील शक्य आहे.

"कार्यकर्ते श्री. कणगीचा आरोप आणि सरकारला आव्हान"

या प्रकरणात जाहीर होऊ न शकलेल्या अहवालावर नाराजी व्यक्त करताना श्री. प्रतिक कणगी म्हणतात,"माहिती अधिकाराच्या माध्यमातून उघड झालेल्या अनियमिततेची अधिकृत चौकशी प्रशासनाने केली आहे; मात्र चौकशी पूर्ण होऊनही कारवाई न होणे ही चिंताजनक बाब आहे. सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर होणे ही प्रशासनाची जबाबदारी असून चौकशी अहवाल तात्काळ जाहीर करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी." त्यांच्या म्हणण्यानुसार, रायगड जिल्हापरिषद व त्याखालील अधिकाऱ्यांच्या चालाखीमुळे सार्वजनिक निधीचा अपहार अधिकच गहिरा झाला आहे. त्यामुळे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, राज्य ग्रामविकास व पंचायत राज सचिव डॉ. एकनाथ डवले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हातचे लक्ष घालून या अधिकाऱ्यांची चवकशी करून कठोर सरकारी कारवाई करावी आणि ग्रामस्थांची फसवणूक थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

"मागण्या"

चौकशी अहवाल जाहीर, दोषींवर कारवाईतात्काळ अंतिम चौकशी अहवाल सार्वजनिक करण्यात यावा.दोषी ठरलेल्या ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा पातळीच्या अधिकाऱ्यांवर शासकीय, आर्थिक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी. अपहारित झालेल्या निधीची वसुली करून तो पुन्हा ग्रामविकासासाठी प्रभावीपणे वापरावा.योग्य कारवाई न झाल्यास, माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून राज्यस्तरीय लोकशाही आणि कायदेशीर मार्गांनी पाठपुरावा तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे

## दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेतील सहभाग व प्राविण्या नुसार क्रीडा सवलत गूण मिळणार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : इयत्ता दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना स्पर्धेतील सहभाग व प्राविण्यानुसार दिले जाणारे क्रीडा सवलत गुण प्रस्ताव यावर्षीपासून शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे केवळ ऑनलाईन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत.

यापूर्वी ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांमार्फत पार पडत होती. तथापि, काही मानवी त्रुटींमुळे अर्ज सादर करण्यास विलंब होत असे किंवा काही विद्यार्थी वंचित राहण्याची शक्यता निर्माण होत असे. यावर प्रभावी उपाययोजना म्हणून मागील शैक्षणिक वर्षापासून पूर्ण प्रक्रिया डिजिटल करण्यात आली असून अर्ज करण्यासाठी 'आपले सरकार' पोर्टलचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

खेळाडू विद्यार्थ्यांनी आपले सरकार ॲप अथवा पोर्टलच्या माध्यमातून अर्ज ऑनलाईन भरावा. जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळ स्पर्धांमधील सहभाग किंवा प्राविण्य यासाठी सवलत गुण अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच सादर करावा. अर्जाची प्रत आपले सरकार पोर्टलद्वारे सर्वप्रथम जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर व त्यानंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास पोहोचेल, त्यामुळे विद्यार्थ्यांनी किवा शाळांनी प्रत्यक्षपणे अर्ज सादर करू नये. आपले सरकार पोर्टल, ॲपवर लॉगिन करून अर्ज भरणे आवश्यक खेळ व प्रमाणपत्रांची माहिती अपलोड करणे, विहित कालावधीमध्ये अर्ज सादर करणे, अर्जाची स्थिती पोर्टलवर नियमित तपासणे याबाबतची नोंद शाळा व महाविद्यालयाच्या शिक्षकांनी घ्यावी. ही नवीन प्रणाली पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित करेल व खेळाडू विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सवलत गुण प्रक्रियेत सुसूत्रता राहील. तरी, सर्व संबंधितांनी या नवीन ऑनलाईन प्रक्रियेनुसारच अर्ज भरावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन 2 मार्चला

**दैनिक युवक आधार**

**नागपूर,प्रतिनिधी :** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सोमवार दोन मार्च रोजी दुपारी १ वाजता करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने लोकशाही दिनाकरीता नागरिकांकडून २ मार्च रोजी दुपारी 12 वाजेपर्यंत तक्रार/निवेदन अर्ज स्वीकारण्यात येणार आहे.

तक्रार अर्ज दाखल केलेल्या नागरिकांना व्यक्तीश: लोकशाही दिनात सहभागी होणे आवश्यक आहे. लोकशाही दिनात सादर करावयाचे तक्रार अर्ज, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील तक्रार अर्जावर एक महिन्यात कारवाई न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार अर्ज सादर करावा. तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे. नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्यामार्फत महापालिका आयुक्त व सभापती यांचे अध्यक्षतेखाली स्वतंत्रपणे लोकशाही दिनाचे आयोजन त्यांचे कार्यालयात होत असल्यामुळे संबंधित तक्रारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनात न दाखल करता संबंधित कार्यालयात आयोजित होत असलेल्या लोकशाही दिनात सादर करावा.

**लोकशाही दिनात न स्वीकारण्यात येणारे अर्ज**

राजस्व, अपील प्रकरणे, न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेला अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार, कार्यालय प्रमुखांनी अंतिम उत्तरे दिलेले प्रकरणे, निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल तर अशा प्रकारचे अर्ज लोकशाही दिनासाठी स्वीकृत करण्यात येणार नाही.

## वन्यप्राणी–मानव संघर्षाच्या मुद्द्यावर विधान परिषदेत चर्चा ; राज्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** राज्यातील वाढता मानव-वन्यप्राणी संघर्ष, बिबट्या व वाघांच्या हल्ल्यांच्या घटनांवर आज विधान परिषदेत सविस्तर चर्चा झाली. विविध सदस्यांनी आपल्या भागातील परिस्थिती मांडत वन विभागाने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.

सदस्य परिणय फुके यांनी मुंबई व शहरी भागात बिबट्याबाबत आकर्षण असले तरी भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना वाघ व बिबट्यांच्या दहशतीला सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले. काही भागातील भटक्या कुत्र्यांमुळे वन्यप्राणी वस्त्यांकडे आकर्षित होत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

यावर उत्तर देताना मंत्री गणेश नाईक यांनी कुत्र्यांना पकडून अन्यत्र सोडण्यास कायदेशीर मर्यादा असल्याचे स्पष्ट केले. वन विभाग व राज्य शासनाच्या स्तरावर सातत्याने बैठका घेण्यात येत असून सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पकडण्यात आलेल्या बिबट्यांची योग्य काळजी घेतली जाते तसेच नगर जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याचा प्रस्ताव असल्याचेही त्यांनी सांगितले.

सदस्य प्रवीण दरेकर यांनी चंद्रपूरसह अनेक जिल्ह्यांत मानव-वन्यप्राणी संघर्ष तीव्र होत असून हल्ल्यांमध्ये नागरिकांचा मृत्यू होत असल्याची बाब मांडली. वन्यप्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा राज्यभर वापर करण्याची मागणी त्यांनी केली.

यास प्रतिसाद देताना मंत्री गणेश नाईक यांनी AI तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येणार असल्याचे सांगितले. वन्यप्राण्यांमुळे मृत्यू झाल्यानंतर दिली जाणारी आर्थिक मदत ही जीवाची भरपाई ठरू शकत नाही, त्यामुळे अशा घटना टाळणे हेच शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सदस्य भाई जगताप यांनीही वन्यप्राणी हल्ले रोखण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करण्याची भूमिका मांडली. कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर आवश्यक संरक्षणात्मक उपाययोजनांसाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी सदस्यांकडून करण्यात आली.मंत्री गणेश नाईक यांनी राज्यात बिबट्यांची संख्या वाढत असल्याने वन विभागाचे हे यश असल्याचे सांगत मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि कोकण व पश्चिम महाराष्ट्र भागात टप्प्याटप्प्याने बिबट्या सफारी सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

## आदिवासी विकास विभागाची प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** आदिवासी विकास विभागाने २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान यशवंत स्टेडियम येथे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६ आयोजित केली होती. विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आदिवासी विभागाचे प्रभारी अतिरिक्त आयुक्त दिगंबर चव्हाण यांनी केले. समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशनी तेलगोटे, शबरीच्या महाव्यवस्थापक रचना मेश्राम, नागपूर येथील



तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष किशोर वानखेडे आणि नागपूर येथील यशवंत मल्टी-पब्लिक वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र सरोदे हे विशेष पाहुणे होते. यावेळी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना दिगंबर चव्हाण म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात आरोग्य सुधारण्यासाठी खेळ हा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. नेहमी खेळ खेळल्याने आपण निरोगी राहतो.

अशा स्पर्धा वेळोवेळी आयोजित कराव्यात. किशोर वानखेडे म्हणाले की, कर्मचाऱ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण केल्याने त्यांचे आरोग्य देखील सुधारते. खेळ हा जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, अशा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. राजू सरोदे म्हणाले की, कोणत्याही कार्यालयात अशा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल आणि ते मानसिक ताणतणावातून बाहेर पडतील, रचना मेश्राम यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या, आभार प्रदर्शन प्रकल्प अधिकारी नागपूर नितीन इसोकर यांनी केले. विजेत्या संघाला आणि खेळाडूंना आकर्षक बक्षिसे आणि ट्रॉफी देण्यात आल्या.

## बालाजी पाटील मोरे यांचा एल्गार! रिसोड पंचायत समितीतील नरेगा कामांवर चौकशीचा फास

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड (वाशीम)पंचायत समिती रिसोड येथील नरेगा अंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारींनंतर अखेर प्रशासनाने कठोर पाऊल उचलत चौकशी समिती नेमली असून संबंधित अधिकाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयात येऊन सखोल चौकशी केली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांच्या आदेशानुसार ही चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून यामुळे पंचायत समितीतील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.चौकशीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांच्या पथकासमोर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, नरेगा विभागातील सर्व कर्मचारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित राहून चौकशीस सहकार्य



केले. या चौकशीदरम्यान अनेक लाभार्थ्यांनी आपले प्रश्न आणि तक्रारी थेट समितीसमोर मांडत प्रशासनातील गंभीर त्रुटींचा पाढा वाचला.घरकुल, गाय गोठा, फळबाग आणि विहीर या योजनांअंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाच्या मास्टर व हप्ते देण्यात मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले. या विलंबामुळे अनेक लाभार्थ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याची व्यथा त्यांनी मांडली. काही प्रकरणांमध्ये लाभार्थ्यांची कामे पूर्ण होऊनही अनुदान मिळत नसल्याने संबंधित कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण

> **"नरेगा अंतर्गत होत असलेल्या अनियमितता आणि लाभार्थ्यांची होणारी आर्थिक लूट ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासनाच्या योजना या गरजू आणि गरीब शेतकऱ्यांसाठी आहेत, मात्र त्यांनाच अनुदानासाठी अडवणूक व त्रास दिला जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."**
>
> **बालाजी पाटील मोरे**
> **जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना**

निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे, घरकुल, विहीर व फळबाग यांसारख्या योजनांचे मस्टर काढण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण केल्याशिवाय काम होत नसल्याचे गंभीर आरोपही चौकशी समितीसमोर करण्यात आले. या प्रकारामुळे पंचायत समितीतील कारभारावर संशय व्यक्त केला जात असून लाभार्थ्यांची उघड लूट होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. या चौकशीवेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे तसेच युवा जिल्हाध्यक्ष सतीश पाटील इढोळे उपस्थित होते. त्यांनी लाभार्थ्यांच्या तक्रारींचे समर्थन करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.दरम्यान, चौकशी समितीने सर्व बाबींची नोंद घेतली असून संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केला जाणार आहे. या अहवालानंतर पंचायत समितीतील अनियमिततेबाबत मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता या चौकशीच्या निष्कर्षाकडे लागले आहे.

## खांदा कॉलनीत फेरीवाल्यांचे योग्य पुनर्वसन होईपर्यंत त्यांच फुटपाथवर बसण्याची परवानगी द्यावी – नगरसेविका सिताताई पाटील

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीतल फेरीवाल्यांचे योग्य पुनर्वसन व्हावे यासाठी पनवेल महापालिकेने योग्य ती उपाययोजना करण्यास मागील वर्षापासून सुरूवात केली आहे या साठी खांदा कॉलनीतल दोन भुखंड पनवेल महापालिकेने रिझर्व्ह केले आहेत त्याठिकाणी मच्छी मार्केट व भाजी मार्केट होईल या ठिकाणी ज्यांची नोंदणी झाली आहे वर्षानुवर्षे जे फुटपाथवर बसून व्यवसाय करत आहेत सिडको मध्ये ज्यांची नोंदणी झाली आहे त्यांना संधी मिळेल असे धोरण महापालिकेकडे जाहीर करण्यात आले आहे परंतु हे पुनवर्सन कधी होईल तो पर्यंत फुटपाथवर व्यवसाय करण्यास फेरीवाल्यांना परवानगी द्यावी अशी मागणी नगरसेविका सिताताई पाटील यांनी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या कडे




केली आहे काही सामाजिक कार्यकर्त्यांन कडून खांदा कॉलनीतल फुटपाथचा प्रश्न उपस्थित केला जात आहे परंतु फुटपाथवर व्यवसाय करणारे गरीब आहेत त्यांना योग्य जागा मिळाली नाही तर ग्राहक येत नाही त्यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे त्यामुळे फेरीवाल्यांचे योग्य नवीन जागी पुनवर्सन झाल्यावरच त्यांना हटवावे व पुनर्वसन प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यात यावा नवीन इमारतीचे लवकर करावे अशी मागणी नगरसेविका स्मिताताई पाटील यांनी केली आहे

# कवी केशवसुत स्मारक, मालगुंड येथे मराठी भाषा गौरव दिवस उत्साहात साजरा




**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मराठी भाषा आपली बोली भाषा आहे. तिचा सर्वत्र अभिमानाने वापर करावा, असे मार्गदर्शन उपजिल्हाधिकारी व मराठी भाषा समिती अध्यक्ष विश्वजीत गाताडे यांनी केले. ते कवी केशवसुत स्मारक, मालगुंड येथे आज मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला.त्याप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी व मराठी भाषा समिती अध्यक्ष विश्वजीत गाताडे, तहसिलदार राजाराम म्हात्रे, प्र. जिल्हा नियोजन अधिकारी अमर पाटील, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक निवास यादव, कवी केशवसुत स्मारक चे अध्यक्ष गजानन पाटील, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मालगुंड शाखा अध्यक्षा नलिनी खेर, कोमसापचे जिल्हाध्यक्ष आनंद शेलार आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. गाताडे पुढे म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. मराठी भाषा ही आपली बोली भाषा आहे. तिचा आपल्याला अभिमान आहे आणि आसायला हवा. आपण सर्वांनी सर्वत्र मराठी भाषेचा वापर करणे गरजेचे आहे. अशा उत्साहाने दरवर्षी असाच कार्यक्रम साजरा करण्यात यावा, असेही ते म्हणाले.

यावेळी कुसुमाग्रजांच्या पुस्तकांचे अभिवाचन करण्यात आले. तीर्था पावसकर हिने मराठी अशी ही आमची मायबोली या विषयावर भाषण केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने तसेच कविवर्य केशवसुत व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. तर कोमसापचे सचिव विद्याधर कांबळे यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी आणि मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यामागचा उद्देश सांगितला. यावेळी नागरिक, कवी, लेखक, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिव स्वामी फाउंडेशन ट्रस्टची महाराष्ट्र कार्यकारिणी जाहिर

## मानव अधिकार आणि माहिती अधिकार कायद्याची करनार जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** शिव स्वामी फाउंडेशन ट्रस्ट हि सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी अग्रगण्य संस्था आहे. संपूर्ण भारत कार्यक्षेत्र असणारी ट्रस्ट ठाणे येथून नोंदणी झाली असून, नोंदणी झाल्यापासून आजपर्यंत ट्रस्ट चे कार्य ठाणे शहरात सुरू आहे.आदीवासी, दुर्गम ग्रामीण भागातील व्यक्तींना शैक्षणिक, सांस्कृतिक, बौद्धिक, आरोग्याच्या इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे, शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक, आध्यात्मिक, आरोग्य, कायदेविषयक इत्यादी क्षेत्रांत कार्य करणे, यासोबतच लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ पत्रकार यांच्या अडीअडचणी समस्या सोडविण्यासाठी शासन प्रशासन दरबारी प्रयत्न करणे, वृत्तपत्र वितरक, वृत्तपत्र पत्र विक्रेते यांच्यासाठी देखील कार्यरत राहणे इत्यादी अनेक उद्देश घेऊन या ट्रस्टची वाटचाल सुरु आहे. या विविध सामाजिक कामांसोबत सहकाऱ्यांना सोबत घेऊन मानव अधिकार व माहिती अधिकार घरा-घरात पोहचविण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य ट्रस्ट च्या माध्यमातून करण्याचा मानस संस्थापक श्री.हिरादास सोनावले यांचा आहे.

मानव अधिकार व माहिती अधिकार या कायद्याची पाहिजे तशी जनजागृती नसाल्याकारणाने व त्याबद्दल प्रशिक्षण नसल्याने मनुष्य या कायदयाचा वापर करण्यास घाबरत आहे.त्यामुळे या कायद्याबाबत तसेच मानव अधिकार याबाबत जनजागृती होणे फार महत्त्वाचे आहे. हाच महत्वाचा उद्देश फाउंडेशनचा आहे. त्या अनुषंगाने हे कार्य घरा घरात पोहचविण्यासाठी संस्थापक हिरादास सोनावले यांनी गाव, विभाग, शहर, तालूका, जिल्हा, राज्य कमिटया तयार करून त्यांच्या माध्यमातून हे कार्य समाजापर्यंत पोहचविण्याचे जनजागृतीचे कार्य करण्याचे ठरवले आणि गुरुवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र कार्यकारिणी जाहिर केली.विविध क्षेत्रात अनुभव असणारे व पारदर्शकपणे सामाजिक कार्य करणाऱ्या अनुभवी व्यक्तींना महाराष्ट्र कार्यकारिणीवर स्थान दिले. त्यामध्ये महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी कल्याण चे नरेंद्र बबन पाटील यांची वर्णी लागली, तर पत्रकारिता व विविध क्षेत्राचा अनुभव असणारे विलास ईश्वर सावंत यांची महाराष्ट्र कार्याध्यक्ष परि निवड करण्यात आली, डोंबिवलीचे राजकुमार गजयसिंह शर्मा महाराष्ट्र कोषाध्यक्ष, घाटकोपर मुंबईचे पत्रकार ज्ञानेश्वर उर्फ नानासाहेब खैरे महाराष्ट्र संघटक, ठाण्याचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व ट्रान्सपोर्ट व्यवसायाचा दांडगा अनुभव असणारे रामदास दादा वाढवणे महाराष्ट्र उपाध्यक्ष, दादर मुंबईचे समाजसेवक जीवन प्रकाश नाबर महाराष्ट्र सल्लागार, कल्याण चे राजेंद्र मालवे महाराष्ट्र संपर्क प्रमुख, कर्जत चे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते जयवंत धर्मा मसणे महाराष्ट्र उपसंपर्कप्रमुख, तर डॉ . शिंगारे यांची महाराष्ट्र महिला संघटक म्हणून निवड करण्यात आली.

# राष्ट्रीय विज्ञान दिनविशेष; मॉर्डन स्कूल वाशी मध्ये पक्षी विज्ञान आणि चिमणी संवर्धन कार्यक्षम संपन्न!



**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मॉर्डन स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज वाशी येथे पक्षी विज्ञान आणि चिमणी संवर्धन कृती या विषयावर विशेष व्याख्यान आणि उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्ह्यातील चिरनेर उरण येथील फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्ग संस्था तर्फे संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी उपस्थित ३५० विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले.

वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत असताना, त्यांच्या संवर्धनासाठी कृतीशील पाऊल उचलणे गरजेचे असल्याचे निकेतन ठाकूर यांनी आपल्या व्याख्यानातून पटवून दिले. केवळ भाषणावर न थांबता यावेळी टाकाऊतून टिकाऊ या संकल्पनेवर आधारित चिमणी संवर्धन कृती राबवण्यात आली.

विद्यार्थ्यांनी टाकाऊ कागदी रोल्स आणि पुठ्ठयांचा वापर करून स्वतःच्या हाताने ७५ घरटी तयार केली ही सर्व घरटी विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली जेणेकरून ते आपल्या घराच्या परिसरात ती लावून चिमण्यांना आश्रय देऊ शकतील.

या उपक्रमासाठी शाळेच्या प्राचार्या स्मिता भोसले मॅडम, तुषार म्हात्रे सर ,विलास कुडावकर सर आणि इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे मोलाचे सहकारी लाभले. निसर्ग संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबवल्याबद्दल फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ‘लाडकी बहीण’ योजनेमुळे इतर खात्यांवर ताण

## विधान परिषदेत मंत्री गणेश नाईक यांची स्पष्ट कबुली

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘लाडकी बहीण’ योजनेमुळे इतर विभागांच्या निधी वाटपावर ताण निर्माण होत असल्याचे स्पष्ट वक्तव्य मंत्री गणेश नाईक यांनी आज विधान परिषदेत केले. त्यांच्या या विधानामुळे सभागृहात राजकीय चर्चेला उधाण आले.

आदिवासी पाड्यांपर्यंत रस्ते विकासाची कामे होत नसतील तर धनगर वाड्यांना जोडण्यासाठी स्वतंत्र रस्ते उभारले जाणार का, असा प्रश्न काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी उपस्थित केला होता. ग्रामीण व दुर्गम भागातील मूलभूत सुविधांच्या विकासाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना मंत्री गणेश नाईक यांनी राज्य शासनाकडून विविध विकास प्रकल्प राबविले जात असल्याचे सांगितले. मात्र सध्या सुरू असलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असल्याने इतर विभागांवर आर्थिक ताण निर्माण झाल्याची कबुली त्यांनी सभागृहात दिली.सरकारकडे अनेक विकासकामे प्रलंबित असतानाही योजनांमधील आर्थिक संतुलन राखण्याचे आव्हान निर्माण झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले. मंत्री नाईक यांच्या या वक्तव्यानंतर राज्याच्या आर्थिक प्राधान्यक्रमांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

# श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात मराठी दिन उत्साहात साजरा




**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय :** भवानीनगर ता.इंदापूर येथील श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा.तुषार दुरगुडे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व पटवून दिले तसेच मराठी साहित्याचा वारसा जपण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून मराठी भाषेबद्दलची आपली निष्ठा अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी प्राचार्या श्रीमती शिवाली माने-देशमुख होत्या तसेच प्राध्यापक व इतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. प्रभावती रणसिंग यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.हर्षदा वानखेडे यांनी केले.मराठी दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या जपणुकीसाठी पुढाकार घेण्याची ग्वाही दिली.

# पोलीस पाटील भरतीतील उमेदवारांनी आमिषांना बळी पडू नये :– उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांचे आवाहन



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी ):** - पोलीस पाटील पदभरतीच्या मुलाखती दिनांक ०१/०३/२०२६ ते ०८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी या पूर्वीच जाहीर करण्यात आलेली आहे. दरम्यान, मुलाखतीमध्ये जास्त गुण मिळवून देण्याच्या नावाखाली काही व्यक्तींमार्फत विविध प्रकारची आमिषे दाखवली जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने सर्व उमेदवारांना अधिकृत आवाहन करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी वसीमा शेख मॅडम यांनी स्पष्ट केले आहे की, मुलाखतीचे गुणदान कोणत्या पद्धतीने व कोणत्या निकषांवर केले जाणार आहे, याची सविस्तर माहिती या पूर्वीच अधिकृत संकेतस्थळावर (Beed.gov.in) प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. गुणदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने व निर्धारित निकषांनुसारच होणार असून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही. “उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवा, प्रलोभन किंवा आमिषांना बळी पडू नये.

कोणी अशा प्रकारची मागणी करत असल्यास त्वरित कार्यालयाशी संपर्क साधावा,” असे आवाहन ही उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांनी केले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, संपूर्ण प्रक्रिया नियमबद्ध व पारदर्शक असून गुणवत्ता व पात्रतेच्या आधारेच अंतिम निवड केली जाणार आहे.

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा.....!



**दैनिक युवक आधार**

**रिसोड (प्रतिनिधी) / रणजीत सिंह ठाकुर :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये 28 फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय नरवाडे, जेष्ठ शिक्षक खुशाल राठोड, ज्येष्ठ शिक्षिका शोभा राऊत व प्रा. अरुण लिमजे त्याचप्रमाणे विज्ञान शिक्षक अर्चना देशमुख,अब्दुल कलीम, संदीप पवार, धनंजय सरनाईक, प्रा. मयूर गवारगूर, प्रा.सुदर्शन पांडे, प्रतिमा अकोशे, सुजाता पवार, सबिहा शेख, विजय नागरे हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान शास्त्रज्ञ डॉक्टर सी.व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य संजय देशमुख यांनी विज्ञान दिन का साजरा करतो याचे तीन मुख्य उद्देश सांगताना आपल्या जीवनात विज्ञानाने जे बदल घडवून आणले आहेत त्याबद्दल शास्त्रज्ञांचे आभार मानणे म्हणजे त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणे, आपल्या मनात येणाऱ्या का? कसे? आणि कधी ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची वृत्ती निर्माण करणे अर्थात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे व केवळ परंपरेने चालत आलेल्या गोष्टींवर विश्वास न ठेवता त्यामागील कार्यकारण भाव शोधणे अर्थात अंधश्रद्धा निर्मूलन या गोष्टींसाठी आपण विज्ञान दिन साजरा करत असतो असे सांगितले. त्याचबरोबर 28 फेब्रुवारी 1928 रोजी डॉक्टर सी.व्ही. रामन यांनी रमण इफेक्ट हा सिद्धांत जगाच्या समोर आणला ज्याच्यासाठी त्यांना सर्वोच्च असा नोबेल पुरस्कार मिळाला असून याव्यतिरिक्त त्यांना भारतरत्न हा भारतीय सर्वोच्च नागरी सन्मान सुद्धा मिळाला असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी उपप्राचार्य संजय नरवाडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन करून विज्ञानवादी बनण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले तुमच्यामध्येच एक वैज्ञानिक दळलेला असून त्याला जागृत करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी जेष्ठ शिक्षक खुशाल राठोड व विज्ञान शिक्षक संदीप पवार यांची समायोचित भाषणे झाली. यावेळी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने सर्व विज्ञान शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीव्हीआयएमएसआर व आयएसटीडी नवी मुंबईतर्फे ‘कॉर्पोरेट एक्स्पेक्टेशन्स’ विषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च (बीव्हीआयएमएसआर) आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (आयएसटीडी), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने “ब्रिजिंग दि गॅप: बीकमिंग कॉर्पोरेट-रेडी” या विषयावर मार्गदर्शनपर सत्राचे २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजन करण्यात आले.

या सत्रासाठी बीव्हीआयएमएसआरचे माजी विद्यार्थी आणि सिप्ला लिमिटेड मुंबई चे ग्रुप ब्रँड मॅनेजर हितेश पेडणेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी युवा व्यवस्थापन पदवीधारकांकडून उद्योगजगताच्या असलेल्या अपेक्षा, आधुनिक कौशल्यांचे वाढते महत्त्व, तसेच करिअरमध्ये प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या व्यावहारिक



क्षमतांबाबत सखोल मार्गदर्शन केले.सत्रात उपस्थित विद्यार्थ्यांना उद्योगातील बदलते प्रवाह, रोजगाराच्या नवीन संधी आणि कॉर्पोरेट जगतातील वास्तविक अपेक्षांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अंजली कळसे, संचालक – बीव्हीआयएमएसआर, यांनी सत्राचे उद्घाटन करताना हितेश पेडणेकर यांच्या प्रेरणादायी व्यावसायिक प्रवासाची माहिती विद्यार्थ्यांसमोर ठेवली आणि त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

डॉ. वैशाली पाटील, अध्यक्षा – आयएसटीडी नवी मुंबई, यांनी विद्यार्थ्यांना अशा शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभागातून सातत्यपूर्ण ज्ञानवृद्धी साधण्याचे आवाहन केले.डॉ. कुलदीप भालेराव, चीफ मेंटर – ह्यूमन कॅपिटल क्लब व ऑपरेशन्स क्लब, बीव्हीआयएमएसआर तसेच सचिव – आयएसटीडी नवी मुंबई, यांनी उद्योग–शैक्षणिक सहकार्याचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. विलासराव कदम (कॅम्पस डायरेक्टर, भारती विद्यापीठ नवी मुंबई), डॉ. अंजली कळसे आणि डॉ. वैशाली पाटील यांचे त्यांनी विशेष आभार मानले. तसेच इमॅन्युएल जोसेफ,तेजस्विनी खराडे,श्रेया गुप्ता,रितेश अडसूळ, युवराज पाटील,समीक्षा भामरे,देवेंद्र रावळ, गौरी शेळके आणि सलील लिमण यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

# भाजपा हा कार्यकर्त्यांच्या श्रम, समर्पण आणि त्यागावर उभा असलेला पक्ष – आमदार बबनराव लोणीकर

## पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाच्या जिल्हा कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**जालना, (प्रतिनिधी)/ नामदेव मंडपे मंठा जालना** : भारतीय जनता पक्षाच्या संघटन विस्ताराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाच्या जिल्हा कार्यशाळेला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा जिल्हा कार्यालयात पार पडलेल्या या कार्यशाळेत आगामी महाभियानाचे नियोजन, कार्यपद्धती, प्रशिक्षणाचा आराखडा आणि संघटन मजबुतीचा रोडमॅप यावर सखोल चर्चा करण्यात आली. कार्यशाळेला माजी मंत्री व आमदार बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मराठवाडा अभियान प्रमुख मनोज पांगारकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले होते. कार्यशाळेच्या सुरुवातीला प्रशिक्षण महाभियानाच्या उद्देशावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाच्या विचारधारेची स्पष्ट समज, संघटन कौशल्याची वाढ, निवडणूक व्यवस्थापनातील प्रशिक्षण आणि समाजाशी प्रभावी संवाद साधण्यासाठी कार्यकर्त्यांना सक्षम करणे हा या महाभियानाचा मुख्य हेतू असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पक्षाचे ध्येय-धोरण पोहोचवून त्यांना नेतृत्वक्षम बनवणे, तसेच बूथ स्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत संघटन अधिक मजबूत करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून नमूद केले. कार्यकर्त्यांना संबोधित करताना आमदार लोणीकर यांनी अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यांनी भारतीय जनता पक्ष स्थापना (१९८० ) आजपर्यंतचा प्रवास, पक्षाच्या वाढीतील संघर्ष, तसेच विचारसरणीची वैशिष्ट्ये यांचा सविस्तर आढावा घेतला. पक्ष हा व्यक्तीपेक्षा विचारावर चालतो, ही परंपरा कायम राखत कार्यकर्त्यांनी संघटनाशी निष्ठा ठेवून काम करावे, असे त्यांनी आवाहन केले. "भाजपा हा कार्यकर्त्यांच्या श्रम, समर्पण आणि त्यागावर उभा असलेला पक्ष आहे. येथे प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा आधारस्तंभ आहे," असे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. या वेळी पक्ष उभारणीत



महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अनेक नेत्यांच्या योगदानाचा आपल्या भाषणात आमदार बबनराव लोणीकर यांनी उल्लेख केला. *त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांचे सर्वसमावेशक नेतृत्व, लालकृष्ण अडवाणी यांचे संघटन कौशल्य, प्रमोद महाजन यांचे आधुनिक राजकीय व्यवस्थापन, गोपीनाथ मुंडे यांचे ग्रामीण जनाधार, तसेच दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानववादाच्या विचारांचा विशेष उल्लेख केला. यासोबतच कुशाभाऊ ठाकरे, श्यामाप्रसाद मुखर्जी आणि रामभाऊ म्हाळगी* यांच्या संघटन बांधणीतील योगदानाचेही त्यांनी स्मरण केले. पुढे बोलताना आमदार लोणीकरांनी दोन खासदार ०२ खासदारा पासून सुरू झालेला पक्षाचा प्रवास ३०० पर्यंत गेला असल्याचे सांगत देशातील सतरा राज्यांमध्ये सहकारी घटक पक्षांसह सरकारे असल्याचे सांगतानाच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने केलेली प्रगती, पायाभूत सुविधा, डिजिटल परिवर्तन, गरीब कल्याण योजना आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा याचा त्यांनी उल्लेख आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. तसेच पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्प, गुंतवणूक, कृषी व शहरी विकास योजना यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी संघटन विस्ताराला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन करत आमदार लोणीकर म्हणाले की, प्रशिक्षण महाभियानातून तयार होणारे प्रशिक्षित कार्यकर्तेच निवडणुकीत विजयाचा पाया ठरतील. बूथ व्यवस्थापन, मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क, स्थानिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भूमिका आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर या चार घटकांवर विशेष भर देण्याचे त्यांनी सांगितले. भाजपा हा लोकशाही तत्वांना बांधील पक्ष असून येथे पदापेक्षा कार्याला महत्त्व दिले जाते, असे नमूद करत "या पक्षात कोणीही मालक नाही; हा पक्ष सर्व कार्यकर्त्यांचा आहे," असा ठाम संदेश यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. कार्यशाळेला जिल्हाभरातील पदाधिकारी, मंडळ प्रमुख, मोर्चा पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. प्रश्नोत्तर सत्रात अनेकांनी संघटन विस्तार, प्रशिक्षण पद्धती आणि निवडणूक नियोजनाबाबत प्रश्न विचारले. कार्यशाळेच्या शेवटी आगामी प्रशिक्षण सत्रांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आणि सर्वांनी संघटन मजबूत करण्याचा संकल्प केला. एकूणच, संघटन कौशल्य वाढवणे, विचारधारा दृढ करणे आणि निवडणूक तयारी अधिक प्रभावी करणे या तीन प्रमुख उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ही कार्यशाळा महत्त्वाची ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. पक्षाच्या आगामी वाटचालीसाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार असून तळागाळातील कार्यकर्त्यांना नवे बळ देणारी ठरली. याप्रसंगी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष भास्करआबा दानवे, जालना महापौर वंदनाताई मगरे, जालना उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर पाटील भांदर्गे, बद्रीनारायण पठाडे, विश्वजित खरात, शिवाजी बापू थोटे, अनिल कोलते, अक्षय गोरंट्याल, अनिलराव कोलते, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, धनराज काबलीये यांच्यासह जिल्हाभरातील भारतीय जनता पक्षाच्या हजारो प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती यावेळी होती.

---

## माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना ( शिंदे गट ) उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती



**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** मंठा पंचायत समितीचे माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट) च्या जालना उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीसाठी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, आम दार हिकमत दादा उढाण, जिल्हाप्रम ख ए.जे. बोराडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रही मागणी केली होती. मुंबई येथे (ता.२६) रोजी राज्याचे मंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते श्री मोरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी आमदार हिकमत दादा

उढाण, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे, बोराडे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, सुदर्शन सोळंके, तुळशीराम कुहिरे यांची उपस्थिती होती.

किसनराव मोरे यांनी मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार

समिती आणि पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे व जनसाम न्यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले. श्री मोरे यांना उपजिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील शिवसेनेला निश्चितच बळकटी मि ळणार आहे. या निवडीमुळे शिवसेना (शिंदे गट) मध्ये नवचैतन्य

निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीमध्ये शिवसेनेचे जास्तीत जास्त सदस्य निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार असे नूतन उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे यांनी सांगितले. या नियुक्तीबद्दल श्री मोरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

---

## महाराष्ट्रात व्यसनमुक्ती चे वारे करुन होळीकेला नमन – केले व्यसनांच्या राक्षसाचे दहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( नासिकेत पानसरे ) :** सामाजिक न्याय विभाग, समाज कल्याण आयुक्तालय, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर - उपनगर व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे.उत्सव आला की व्यसन आले. होलिकेला नमन केले व्यसनांचे दहन या व्यसनांची होळी या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ दुपारी २.३०ते ५.०० वाजेपर्यंत १३८ बेस्ट बस स्टॉप जवळ, कॅपिटल सिनेमा समोर, बेस्ट बस डेपो, सिएसएमटी (प), मुंबई येथे करण्यात आले होते.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर प्रसाद खैरनार यांनी व्यसनमुक्तीसाठी उचलेले हे पाऊल स्वागतार्ह असल्याचे त्यांनी दिलेल्या संदेशात म्हटले होते. कारण व्यसनांना अटकाव करायचा असेल तर सुरुवात तंबाखू पासून करावी लागेल. यावेळी दारु, गुटखा, सिगारेट, अमली पदार्थ, गांजा, अफू, गर्द, ड्रग्ज, चरस यांची वेष्टणे,आवरणे या व्यसनांचा आठ फुटी भव्य राक्षसाचे प्रतिकात्मक दहन करण्यात आले. जेणेकरुन समाजातील व्यसनांचा समूळ नाश होईल व निर्व्यसनी मुंबई व महाराष्ट्राचे स्वप्न पुर्ण होईल.

कार्यक्रमाची सुरुवात अपुनको नको लिमिट, लिकर,टोबँको, ड्रग्ज या व्यसनमुक्तीवरील प्रजापिता ब्रम्हकुमारीज यांच्या पथनाट्याने समुदायांत प्रबोधन घडवून आणले. आपण करित असलेल्या व्यसनामुळे

जखडलेल्या राक्षसाने आपल्या मुसक्या आवळल्याचे चित्रण यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या




पथनाट्यातुन दाखविण्यात आले.

व्यसनांच्या या राक्षसाभोवती व्यसनांचे दुष्परिणाम दर्शविणारी पोस्टर्स प्रदर्शनी लोकांचे लक्ष वेधुन घेत होती. व त्यातुन व्यसनांचा आयुष्यावर किती घातक परिणाम होतो व त्यापासुन परावृत्त राहुन आनंदी जिवन जगण्याचा अनमोल सल्ला उपस्थितांना मिळाला. वाचा विचार करा आणि निर्व्यसनी महाराष्ट्र निर्माण करण्याच्या संकल्पात सहभागी व्हा या पत्रकांचे वाटप यावेळी करण्यात आले.नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी मार्गदर्शन करताना व्यसन हा मानसिक, शारिरीक व कौटुंबिक आजार आहे व तो दूर होऊ शकतो. एखाद्या माणसाला व्यसन कोणते आहे व ते किती आहे यावर त्याचे उपचार अवलंबून असतात. आपणही उपचार करुन बरे होऊ शकता त्यामुळे स्वतः व ईतरांना निर्व्यसनी करण्यासाठी नशाबंदी मंडळात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले व उपस्थित जनसमुदायाला निर्व्यसनी राहण्याचा संकल्प दिला. मुंबई येथे होणाऱ्या या होळीच्या अनोख्या कार्यक्रमास स्थानिकांचा उस्फुर्त प्रतिसाद होता.याच प्रकारच्या होळीच्या कार्यक्रमाचे आयोजन संपुर्ण महाराष्ट्रात करण्यात आले असुन नुसतेच वरील व्यसने नव्हे तर सध्याच्या दैनंदिन जिवनात असणारी सोशल मिडियातील फेसबुक, व्हाँट्सअप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या व्यसनांना पुढील काळांत गंभिरतेने सामोरे जावे लागणार आहे त्यामुळे अशा व्यसनांचे ही दहन करावे असे आवाहन उपस्थितांना सरचिटणीस यांनी केले.

व्यसनांच्या राक्षसाचे प्रतिकात्मक दहन मंडळाचे उपाध्यक्ष एकनाथ तांबवेकर, सरचिटणीस वर्षा विद्या विलास, चिटणीस अमोल स. भा. मडामे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था बोरिवली चे प्राचार्य, रंगारी शिल्पनिदेशक सुनिल दहिवलकर, लाला लजपत राय महाविद्यालयाचे रा. से. यो. चे विद्यार्थी, कार्यकर्ते उपस्थित जनता यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी समाजातील व्यसनांना बदनाम करण्यासाठी उपस्थितांनी व्यसनांच्या विरोधात घोषणा व बोंबा मारल्या अशी माहिती मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी दिली.

---

## इसेक्टकॉन २६ वी वार्षिक परिषद मुंबईत संपन्न

### 'नेक्स्ट-जेन परफ्यूजनः एआय, रोबोटिक्स-वैयक्तिकीकृत काळजी' विषय केंद्रस्थानी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** ारतीय एक्स्ट्राकॉर्पोरियल टेक्नॉलॉजी सोसायटीची (आयएसईसीटी) २६ वी वार्षिक राष्ट्रीय दोन दिवशीय परिषद 'इसेक्टकॉन २०२६' मुंबई स्काय सिटी येथील हॉटेल ऑरिका येथे आयोजित करण्यात आली. आघाडीचे हृदयरोग निगा तज्ज्ञ, परफ्यूजनिस्ट, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. 'नेक्स्ट-जेन परफ्यूजन: एआय, रोबोटिक्स आणि वैयक्तिकीकृत काळजी' या संकल्पनेवर केंद्रित असलेल्या या दोन दिवसीय परिषदेत भारतातील आणि परदेशातील तज्ज्ञांना एकत्र आणून तंत्रज्ञानसमर्थ हृदय शस्त्रक्रिया आणि अतिदक्षता निगा हे क्षेत्र कसे बदलत आहे यावर चर्चा करण्यात आली.

'हार्ट सर्जन' हा शब्द व्यापकपणे वापरात येत असला तरी, परफ्यूजनिस्टची (Perfusionist) त्यासमयी असलेली भूमिका जनतेला मोठ्या प्रमाणात अपरिचित आहे. परफ्यूजनिस्ट हा प्रशिक्षित आरोग्यसेवा व्यावसायिक असतो जो ओपन-हार्ट सर्जरी दरम्यान हृदय-फुफ्फुसांचे यंत्र चालवतो. जेव्हा एखादा सर्जन तात्पुरते हृदय थांबवून शस्त्रक्रिया करतो, तेव्हा रुग्णाच्या शरीरात ऑक्सिजनयुक्त रक्त सतत फिरत राहील याची खात्री परफ्यूजनिस्ट करत असतो. त्यांची भूमिका केवळ हृदय शस्त्रक्रियांमध्येच नाही तर हृदय किंवा फुफ्फुस निकामी झालेल्या रुग्णांना आधार देणाऱ्या ईसीएमओ (ECMO) सारख्या जीव-रक्षक प्रणालींमध्ये देखील महत्त्वाची असते. जीवरक्षक प्रक्रियांमध्ये केंद्रस्थानी असूनही, परफ्यूजनिस्ट बहुतेकदा पडद्यामागे काम करत असतात. पर्यायाने त्यांना सार्वजनिक मान्यता देखील मर्यादितच मिळते. हे जागरूकतेतील अंतर 'इसेक्टकॉन २०२६' ही परिषद भरून काढण्याचा प्रयत्न करत आहे, तसेच भारताच्या आरोग्यसेवा परिसंस्थेमध्ये मजबूत व्यावसायिक मान्यता, संरचित प्रशिक्षण मार्ग आणि परफ्यूजन विज्ञानाची व्यापक समज या गरजेवर देखील तिने लक्ष केंद्रित केले.

पहिल्या दिवशी झालेल्या वैज्ञानिक सत्रांमध्ये परफ्यूजन कार्यप्रणालीमधील प्रगती, बालरोग हृदयरोग काळजी आणि शस्त्रक्रिया समर्थन प्रणालींमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्सचे वाढते एकत्रीकरण यावर लक्ष केंद्रित केले गेले. 'पुरावा विरुद्ध अनुभव' या विशेष चर्चेत क्लिनिकल कौशल्यासह डेटा-चालित निर्णयांचे संतुलन साधण्यावर खुल्या संवादाला प्रोत्साहन देण्यात आले. उद्घाटन समारंभात वरिष्ठ व्यावसायिकांना या क्षेत्रातील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. दुसऱ्या दिवशी जटिल हृदयरोग



प्रक्रियांमधील प्रगत धोरणांवर आणि पुनर्प्राप्ती आणि प्रत्यारोपणासाठी पूल म्हणून ईसीएमओची विकसित होत असलेली भूमिका यावर लक्ष केंद्रित केले.

रवींद्र सावर्डेकर, आयोजन सचिव, इसेक्टकॉन म्हणाले,"प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करणाऱ्या हृदयरोगतज्ज्ञांना बरेच लोक ओळखतात, परंतु त्या शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाला जिवंत ठेवणाऱ्या परफ्यूजनिस्टला फार कमी लोक ओळखतात. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर हा येथे क्लिनिकल निर्णयाची जागा घेण्यासाठी होणार नाही. तर त्याला पूरक ठरण्यासाठी तो येथे होईल. परफ्यूजन कार्यप्रणालीमध्ये एआयचा वापर समाकलित करून, आपण अचूकता सुधारू शकतो, रुग्णांची सुरक्षितता वाढवू शकतो आणि अतिदक्षतेच्या क्षणी जलद, चांगल्या प्रकारे माहितीपूर्ण निर्णय घेता येऊ शकेल. परफ्यूजन-विज्ञान रुग्णसेवेला बळकटी देते याची खात्री करणे, जुळवून घेणे, शिकणे आणि खात्री करणे ही आमची जबाबदारी आहे.भारतात, परफ्यूजनच्या महत्त्वाच्या क्षेत्राबद्दल जागरूकतेचा अभाव आहे, तसेच प्रशिक्षित व्यावसायिकांची कमतरता आहे. दरवर्षी हृदय शस्त्रक्रिया आणि जीवन-समर्थन उपचारांची संख्या वाढत असल्याने, परफ्यूजनिस्टची मागणी वेगाने वाढत आहे. म्हणूनच, या क्षेत्रात शिक्षण आणि प्रशिक्षण मजबूत करणे आणि सरकारी पातळीवर स्पष्ट ओळख सुनिश्चित करणे अत्यंत महत्वाचे आहे."

या परिषदेचे नेतृत्व राजेंद्र कोकणे (आयएसईसीटी, अध्यक्ष), लोकनाथ तिवारी (आयएसईसीटी, सरचिटणीस), जगन्नाथ काळुगडे (आयोजन अध्यक्ष), विकास माळी (आयोजन अध्यक्ष), रवींद्र सावर्डेकर (आयोजन सचिव), शशिकांत मेमाणे (संयुक्त सचिव), योगेश लुडबे (कोषाध्यक्ष) आणि रफिक शेख (वैज्ञानिक समिती) यांच्यासह वरिष्ठ आयएसईसीटीचे नेतृत्व आणि कार्यकारी सदस्य यांनी केले. हृदयरोग रुग्णाच्या निगा तंत्रज्ञानावर आधारित होत असलेली, इसेक्टकॉन २०२६ परिषद एक साधा पण शक्तिशाली संदेश बळकट करते प्रत्येक यशस्वी हृदय शस्त्रक्रियेमागे एक समन्वित संघ असतो आणि त्या संघाच्या केंद्रस्थानी परफ्यूजनिस्ट असतो, जो शांतपणे रुग्णाचे जीवन प्रवाहित राहील याची खात्री करतो.

---

## कलंबोलीतून ३६ वर्षीय तरुण बेपत्ता ; शोध घेण्याचे पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**कलंबोली (वार्ताहर ):** येथील स्टील मार्केटमधील एका गोदामात कामाला असलेला पंकजकुमार रामसागर गुप्ता (वय ३६) हा तरुण गेल्या पाच दिवसांपासून बेपत्ता झाला आहे. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास पंकजकुमार हा कलंबोली येथील रोड नं. १, प्लॉट नं. १६८ येथील गोदामात कामावर असताना, कोणास काहीही न सांगता निघून गेला. त्यानंतर तो घरी परतलाच नाही. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेऊनही तो मिळून आला नाही

बेपत्ता व्यक्तीचे वर्णन:

नाव: पंकजकुमार रामसाग

उंची: १६० सेंमी, रंग



सावळया, चेहरा उभट.

पेहराव: अंगात शर्ट-ग्रीन फुल शर्ट आणि निळया रंगाची पॅन्ट.

विशेष ओळख: डोळयावर चष्मा आणि चेहऱ्यावर दाढी आहे.

या वर्णनाची कोणतीही व्यक्ती आढळल्यास किंवा त्याबाबत काही माहिती मिळाल्यास तातडीने कळंबोली पोलीस ठाणे 8655354115 , 9594832244 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## एकता मित्र मंडळ लाईन आळी तर्फे हॉलिकोत्सव व संत तुकाराम महाराज बीज निमित्त सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** एकता मित्र मंडळ लाईन आळी तर्फे सार्वजनिक हॉलिकोत्सव( होळी) व संत तुकाराम महाराज बीज निमित्त सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर कार्यक्रम श्री हनुमान मंदिर, कै.दशरथशेठ धोंडू कुरघोडे, व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे.




एकता मित्र मंडळ, लाईन आळी यंदा ५५ वर्ष पूर्ण करून ५६ व्या वर्षात पदार्पण करत आहेत, या निमित्ताने होळी उत्सव, सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसाद आयोजन त्याचप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम रविवार दि १ मार्च रोजी क्रिकेट सामने, सोमवार २ मार्च रोजी होळी पूजन व लहान मुलांचे खेळ, ३ मार्च रोजी मुला - मुलींचे खेळ, ४ मार्च रोजी खेळ, खुला गट व महिला, ५ मार्च रोजी तुकाराम बीज निमित्त सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद शुक्रवार ६ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा होणार आहे. सदर मंडळाचे स्फुर्तीस्थान स्व.लक्ष्मणशेठ दशरथशेठ कुरघोडे हे आहेत. एकता मित्र मंडळ लाईन आळी पनवेलच्यावतीने अध्यक्ष गौरव सावंत, उपाध्यक्ष कपिल कुरघोडे, सचिव अभिजित साखरे, खजिनदार मितेश भोपी, सदस्य अश्विन सातारकर, सनील बेंडखळे, विवेक पवार, सुमित दसवते, साहिल मोरे, मयुरेश कुरघोडे, कैलास गायकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नागरिकांना हॉलिकोत्सव, महापूजा व महाप्रसाद यासाठी उपस्थित राहण्याचे कळकळीचे आवाहन केले आहे.

## जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीतील मनोरुग्णास येरवडा येथे उपचारासाठी माणुसकी टिम चे मदतकार्य

**दैनिक युवक आधार**

**रमेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर)** : सदर मनोरुग्ण व्यक्ती नामे सौरभ हिरोबा देवर्षी राहणार वसंतनगर जवाहर कॉलनी परीसरातील स्थानिक नागरिकांनी व त्याचे मामा सुरेश औरंगे यांनी पोलीस स्टेशन येथे वारंवार माहिती दिली कि सदर व्यक्ती हा हिंसक वागत आहे.व दगडे हातात घेऊन मारहाण करित आहे व रात्री बेरात्री परिसरात फिरतो जोरजोरात ओरडतो रोडवरील चालु वाहनांना आडवतो

त्यापासून लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे.व तो बऱ्याच दिवसापासून मनोरुग्ण सारखे वागत आहे.त्याचे आई वडील वृद्ध मयत आहे. मामाच त्याचा सांभाळ करीत होते त्यांना देखील मारहाण करतो.मामांनी त्यास प्रेरणा हास्पीटल येथे उपचार घेतले आहे परंतु त्याचा मानसिक आजार आता जास्त झाल्याने तो धिंगाणा घालत आहे. अशी माहिती परिसरातील नागरिकांनी व त्यांचे मामा यांनी जवाहरनगर पो.स्टे ला दिली असता जवाहरनगर पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक सचिन कुंभार यांना दिली जवाहरनगर पोलीसांनी सदर मनोरुग्णासाठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी




सेवाभावी संस्थेचे समाजसेवक सुमित पंडित यांना सदर रुग्णाची माहिती दिली. सुमित यांनी तात्काळ पो.स्टे. येथे जाऊन वसंतनगर परिसरात पेशंट ला शोधुन शाहनीशा केल्यावर सदर रुग्ण सौरभ हा मोठमोठे केस व दाढी वाढवून जोरजोराने ओरडत होता.सदर रुग्णाला ताब्यात घेणे मोठे अवघड झाले होते.तो हिंसक वृत्ती चा असल्याने कोणाला जवळही येऊ देत नव्हता सदर मनोरुग्ण यास उपचारासाठी पुणे येथे घेऊन जावे सोपे नव्हते.सुमित पंडित यांनी शासकीय रुग्णालय घाटी मानस उपचार तज्ञ श्री प्रसाद देशपांडे यांचा सल्ला घेतला व त्यास जवाहरनगर पोलीसांच्या मदतीने त्यास माणुसकी समुहाच्या टिम ने त्यास हात पाय बांधून ताब्यात घेतले व शासकीय रुग्णालय संभाजीनगर घाटी रुग्णालयातील मानसोपचारतज्ज्ञ यांनी औषधोपचार करून त्यास पुढिल उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे नेण्याचा सल्या डॉक्टरांनी दिल्यानंतर कायदेशीर कागदोपत्री पुर्तता करुन आज त्यास येरवडा पुणे येथे १०८ ॲम्ब्युलन्स वाहनाने उपचारासाठी माणुसकी टिम च्या सभासदांनी मदतकार्य करुन उपचारासाठी दाखल केले.सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी झोन-२,मशीन कल्याणकर, सा.पो.

आयुक्त,सचिन कुंभार पोलीस निरीक्षक जवाहर नगर,मारुती खील्लारे पो.उप निरिक्षक,जमधडे,राजेश चव्हाण,१०८ अँबुलंस डि.एम.अतुल मुरुगकर,ए डि.एम.सचिन पालवे,डॉ किरण देशमुख,माणुसकी समुहाचे सुमित पंडित,संचालीका माणुसकी वृध्द सेवालय पुजा पंडित आदिनी मदतकार्य केले.

माणुसकी समुहाचे कार्य मनोरुग्णानसाठि लाख मोलाचे पोलीसांना होतीय मोठि मदत

मनोरुग्णांच्या जवळ देखील कोणी जायला तयार होत.हे आम्ही स्वतः अनुभवले नाही ते खूप सेन्सिटिव्ह असतात कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात परंतु समाजसेवक सुमित पंडित करत असलेल्या रंजल्या गांजल्यांच्या सेवा ही खरंच वाखाडणे योग्य आहे.

मनोरुग्णानसाठि ते स्वतःदाढी कटिंग व स्वच्छ अघोळ घालुन त्यांना माणसात आणतात व त्यांना हक्काचा निवारा मिळवून देतात आज प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी त्यांना या मनोरुग्णाच्या कोणी जवळही जाण्याची हिंमत करत नव्हते त्याप्रसंगी समाजसेवक सुमित पंडित यांनी मोठे हिमतीने त्या कायदेशीर प्रक्रीया करुन

**उपचारासाठी पुणे येथे दाखल केले आहे.पोलीसांना सुमित पंडित हे रात्री बेरात्री फोन केला की नि स्वार्थ भावनेने मदतीसाठी तयार असतात त्यांची पोलीसांना वेळोवळी मदत होत आहे.त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार समाजात अशी खूप कमी लोक आहेत की ते दुसऱ्यासाठी जगतात.**

**- सचिन कुंभार पोलिस निरीक्षक जवाहरनगर पोलीस स्टेशन**

## कारागृह शिक्षण क्षेत्रात वाशिमचा डंका ; लक्ष्मीकांत खोडे यांच्या निवडीवर माजी आमदार ऍड .विजयरावजी जाधव यांची कौतुकाची थाप

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवण्याचा प्रेरणादायी आदर्श समोर ठेवत श्री.लक्ष्मीकांत जगन्नाथ खोडे यांची छत्रपती संभाजीनगर येथे कारागृह शिक्षकपदी निवड झाली आहे. ही निवड केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाची नोंद नसून, शिक्षणाच्या माध्यमातून नवजीवन देण्याच्या महान कार्याचा सन्मान मानला जात आहे. या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, माजी आमदार ऍड. विजयरावजी जाधव यांनीही त्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.



कारागृहातील शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकांचे अध्यापन नव्हे, तर जीवनाला नवी दिशा देण्याचे, चुकांमधून सावरण्याचे आणि माणूसपणाला नव्याने जागवण्याचे अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण कार्य आहे. अशा वातावरणात शिक्षकाची भूमिका ही केवळ मार्गदर्शक नसून, प्रेरणादायी दीपस्तंभाची असते. श्री. लक्ष्मीकांत खोडे यांच्या निवडीमुळे अनेक कैद्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरून त्यांना नव्या जीवनाची आशा मिळणार आहे.

या निवडीबद्दल श्री. लक्ष्मीकांत खोडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि शिक्षणसेवेतील समर्पणामुळेच त्यांना हा सन्मान प्राप्त झाला असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. यावेळी माजी आमदार ऍड.विजयरावजी जाधव यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत,शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करावे, असा विश्वास व्यक्त केला.

**कारागृहातील शिक्षण ही समाजपरिवर्तनाची प्रभावी प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचारांना नवी दिशा मिळते आणि तो समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सन्मानाने उभा राहू शकतो. श्री लक्ष्मीकांत खोडे यांची कारागृह शिक्षकपदी झालेली निवड ही त्यांच्या समर्पणाची पावती असून, त्यांच्या कार्यातून अनेकांचे जीवन उजळेल, असा मला विश्वास आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.**

**— ऍड.विजयरावजी जाधव, माजी आमदार**

श्री.लक्ष्मीकांत खोडे यांची ही निवड वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत असून, त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. शिक्षणाच्या माध्यमातून नवसंजीवनी देण्याच्या या कार्यासाठी त्यांना सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## पेन्शनसाठी ५ मार्चला आझाद मैदानावर 'एल्गार'

### शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 'श्रद्धांजली अर्पण' आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या पेन्शन पिडीत कर्मचारी आणि मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या न्याय हक्कासाठी ५ मार्च २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर 'श्रद्धांजली अर्पण' आंदोलन छेडण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य पेन्शनग्रस्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. विजय शिरोळकर यांनी ही माहिती दिली. गेल्या दोन वर्षांपासून ही संघटना जुनी पेन्शन लागू करण्यासाठी सातत्याने लढा देत आहे.

या आंदोलनाद्वारे मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना तात्काळ जुनी पेन्शन मिळावी, नवीन पेन्शन योजना (NPS) रद्द करावी आणि सर्वोच्च न्यायालयात शासनाने सकारात्मक शपथपत्र सादर करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. नागपूर खंडपीठाच्या निर्णयानुसार १०० टक्के अनुदानित शाळांमधील तुकडीवरील कर्मचाऱ्यांनाही पेन्शनचा लाभ मिळावा, असा संघटनेचा आग्रह आहे. शासन या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

सेवानिवृत्तीनंतर अनेक शिक्षकांना भाजीपाला विकणे किंवा सुरक्षा रक्षकाचे काम करावे लागत आहे, ही राज्यासाठी खेदजनक बाब असल्याचे प्रा. शिरोळकर यांनी म्हटले आहे. या निष्ठुर धोरणाचा निषेध करण्यासाठी हजारो कर्मचारी मुंबईत एकवटणार आहेत. या आंदोलनाची दखल न घेतल्यास 'आमरण उपोषण' करण्याचा इशारा संघटनेचे उपाध्यक्ष प्रा . संपत कदम, कार्याध्यक्ष प्रा. योगेश्वर निकम, सचिव भास्कर देशमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## मुंबई उपनगर ग्राहक पंचायत कुर्ला तालुका अध्यक्षपदी संजय येवले तर ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे सचिवपदी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन केलेल्या ग्राहक पंचायत महाराष्ट्र, मुंबई उपनगर तालुका कुर्लाच्या अध्यक्षपदी समाजसेवक संजय येवले तर सचिवपदी ज्येष्ठ पत्रकार समाजभूषण नासिकेत पानसरे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. २०२६- २०२७ साठी ही कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. कार्यकारिणी मध्ये उपाध्यक्ष दिनेश बैरिशेट्टी, संघटक जयश्री खिलारी, सहसंघटक संतोष अनंतवार, सहसंघटक महिला डॉ.अमिता हळदणकर, सहसचिव राजाराम राव, कोषाध्यक्ष- प्रणिता वैराळ, प्रसिद्धी प्रमुख सहिष्णुता कांबळे, सल्लागार मुकुंद कुलकर्णी, सदस्य : स्मिता कवडे यांची निवड झाली आहे.



## प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मराठी गौरव दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 27 फेब्रुवारी हा ज्येष्ठ साहित्यिक, कवी,कादंबरीकार विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस असून त्याच निमित्ताने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संस्थेचे व्हा.चेअरमन मा.श्री. इम्रान शेख,प्राचार्य श्री.सुधिर भिसे तसेच गौस सर उपस्थित होते. सुरुवातीला कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना शेख मॅडम यांनी केली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून मराठी भाषेचा गौरव केला. तिसरी व नववीच्या विद्यार्थिनींनी मराठी गीते व अभंग सादर केले,तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थिनींनी "बीज जसे अंकुरते"या गीतावर नृत्य सादरीकरण केले.श्रावणी भोसले व सोमनाथ शर्मा यांनी कुसुमाग्रजांविषयी तसेच मराठी गौरव दिनाचे महत्त्व यावर भाषणे दिली.सूत्रसंचालन इयत्ता आठवीच्या अपेक्षा खामगळ व सेजल माने यांनी केले आभार प्रदर्शन समीक्षा दिवसे हिने केले.





## फुफ्फुस प्रत्यारोपण : भारतातील अडथळे आणि संधी !

**मुंबई :** भारतामध्ये फुफ्फुस प्रत्यारोपण ही अत्यंत प्रगत पण अजूनही मर्यादित प्रमाणात उपलब्ध असलेली वैद्यकीय सेवा मानली जाते. गंभीर फुफ्फुस विकारांनी ग्रस्त रुग्णांसाठी हा उपचार जीवनदान ठरू शकतो, मात्र याच्या अंमलबजावणीत अनेक संरचनात्मक, आर्थिक आणि सामाजिक अडचणी अजूनही कायम आहेत.

तज्ज्ञांच्या मते, भारतात फुफ्फुस प्रत्यारोपणाची गरज झपाट्याने वाढत असली तरी प्रत्यक्षात होणाऱ्या शस्त्रक्रियांची संख्या अत्यंत कमी आहे. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे अवयवदानाबाबतची कमी जागरूकता आणि मृत्यूनंतर अवयवदानासाठी मिळणाऱ्या संमतीचे कमी प्रमाण. मेंदूमृत (ब्रेन डेड) रुग्णांकडून फुफ्फुसे उपलब्ध होणे ही प्रत्यारोपण प्रक्रियेतील महत्त्वाची कडी असते, परंतु अनेक रुग्णालयांमध्ये अशा प्रकरणांची योग्य नोंद किंवा समन्वय होत नाही.

फुफ्फुस प्रत्यारोपण इतर अवयव प्रत्यारोपणांपेक्षा अधिक गुंतागुंतीचे मानले जाते.



फुफ्फुसे बाहेरील वातावरणाशी सतत संपर्कात असल्यामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. त्यामुळे दात्याचे आणि रुग्णाचे आरोग्य निकष अत्यंत कठोर असतात. यामुळे उपलब्ध दात्यांपैकी फारच कमी फुफ्फुसे प्रत्यारोपणासाठी योग्य ठरतात.याशिवाय, देशात अत्याधुनिक पायाभूत सुविधा असलेली प्रत्यारोपण केंद्रे मोजकीच आहेत. विशेष प्रशिक्षित शल्यचिकित्सक, आयसीयू सुविधा, इसीएमओ सारखी जीवनरक्षक यंत्रणा आणि प्रशिक्षित बहुविभागीय वैद्यकीय टीम आवश्यक असते. ही सुविधा मुख्यतः महानगरांपुरती मर्यादित असल्याने ग्रामीण किंवा लहान शहरांतील रुग्णांना उपचार मिळण्यात मोठी अडचण निर्माण होते.आर्थिक खर्च हे देखील मोठे आव्हान आहे. फुफ्फुस प्रत्यारोपण आणि त्यानंतरचे दीर्घकालीन औषधोपचार अत्यंत महाग असतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला आयुष्यभर रोगप्रतिकारक शक्ती कमी करणारी औषधे घ्यावी लागतात. अनेक रुग्णांसाठी हा खर्च परवडणारा नसल्याने उपचार अपूर्ण राहतात.तथापि, या क्षेत्रात सकारात्मक बदलही दिसून येत आहेत. देशातील काही प्रगत वैद्यकीय संस्थांनी यशस्वी फुफ्फुस प्रत्यारोपण करून जागतिक स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारलेली शस्त्रक्रिया पद्धती आणि प्रत्यारोपणानंतरची निगा यामुळे यशाचे प्रमाण वाढत आहे. तसेच 'ग्रीन कॉरिडॉर'सारख्या व्यवस्थेमुळे अवयव जलद गतीने एका शहरातून दुसऱ्या शहरात पोहोचवणे शक्य झाले आहे.

सरकारने लागू केलेला 'ट्रान्सप्लांटेशन ऑफ ह्युमन ऑर्गन अँण्ड टिश्यू ॲक्ट १९९४' हा कायदा अवयवदान प्रक्रियेला नियमन आणि पारदर्शकता देण्याचे महत्त्वाचे काम करतो. अवैध अवयव व्यापार रोखणे आणि अधिकृत प्रत्यारोपण प्रणाली मजबूत करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.तज्ज्ञांच्या मते, भविष्यात भारतात फुफ्फुस प्रत्यारोपण वाढवण्यासाठी तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत यात जनजागृती वाढवणे, अधिक प्रत्यारोपण केंद्रे विकसित करणे आणि आर्थिक सहाय्य योजनांचा विस्तार करणे. अवयवदानाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्यास हजारो रुग्णांचे प्राण वाचू शकतात.एकूणच, भारतात फुफ्फुस प्रत्यारोपण क्षेत्रात मोठी क्षमता असूनही अनेक अडथळे आहेत. योग्य धोरणे, तांत्रिक प्रगती आणि समाजाचा सहभाग यामुळे भविष्यात हे उपचार अधिक सर्वसामान्य आणि उपलब्ध होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.